

साडेतीन

शं. रा. देवळे

श्री

गुरुवर्य महामहोपाध्याय श्री. दत्तो वामन पोतदार यांचे सेवेशी,

अभिप्रायार्थ आदरपूर्वक भेट

शं. रा. देवळे

दि. ५.८.१९६५

अभिप्राय कृपया पुढील पत्त्यावर धाडावा.
७८ शुक्रवार पेठ, आफळेवाडा, पुणें २.

पेशवाईतील

साडेतीन शहाणे

शंभूराव रामचंद्र देवळे

इनामदार बंधु प्रकाशन : पुणें २

□

प्रकाशक :

बा. शा. इनामदार

इनामदार बंधु प्रकाशन

९९१ सदाशिव, पुणें २

□

मुद्रक :

ह. म. गद्रे

जनवाणी प्रिंटिंग प्रेस

४५ बुधवार पेठ, पुणें २

□

□

किंमत दीड रुपया

□

सजावट :

दत्ता महाबळेश्वरकर

□

आवृत्ति पहिली :

विजया दशमी शके १८८५

दि. २८ सप्टेंबर, १९६३

माझे स्नेही
श्री. रामचंद्र चिंतामण ढेरे
यांस सप्रेम अर्पण

शं. रा. देवळे

□

□

अनुक्रम

शहाण्यांच्या भेटीपूर्वी

‘ रिक्तपाणिर्न पश्येत राजानं देवतां गुरुं ’ अशी आपणा आर्यांची रीति आहे. (रिकाम्या हातानें राजा, देवता किंवा पूज्य व्यक्ति गुरु ह्यांचें दर्शन, भेट घेऊं नये.) त्याप्रमाणें येथेंहि ‘ रिक्त-बुद्धिर्न पश्येत सार्धत्रयविचक्षणाः ’ असें म्हणतां येईल. शहाण्यांचें शहाण-पण सुद्धां आपण जर थोडेहि शहाणे नसूं तर घेतां येत येत नाहीं, किंवा घोटाळ्यांत पाडतें. त्यांतहि ज्यांचें शहाणपण विवेकपूर्वकच लक्षांत घ्यावयास पाहिजे, त्यांचे बाबतींत तर हें म्हणणें जास्तीच खरें आहे.

प्रस्तुत पुस्तकाचें नांव ‘ साडेतीन शहाणे ’ हें आहे. जवळपास साऱ्या पेशवाईचा काल तो ह्या तिघा चौघा शहाण्यांचा काल. (इ.१७३०–१८००) आणि कार्यक्षेत्रहि उत्तर भारत व दाक्षिण भारत एवढें. विस्तृत हें खरेंच आहे कीं, एवढ्या कालांत आणि इतक्या विस्तीर्ण कार्यभूमीमध्यें सातत्यानें ह्यांची कामगिरी निगडित आहे असें नाहीं. अधूनमधून व विवक्षित स्थळींच ती आहे. तरी देखील जी कांहीं माहिती आज ह्या चौघांची प्रसिद्ध आहे तीहि संपूर्ण द्यावयाची म्हटलें तर परंतु पुस्तकाच्या साडेतीन पट तरी पानें कमींत कमी लागतील. परंतु ह्या पुस्तकाचा हेतु विद्यार्थ्यांना आणि प्रौढ सामान्य जनांना ह्या विशिष्ट व ऐतिहासिक म्हणीचा उलगडा करून द्यावयाचा असा व एवढाच साधा असल्यामुळें हें छोटेखानी पुस्तक वाचकांपुढें येत आहे.

हें सांगण्यांतलाहि हेतु हा कीं, ह्या चौघांचे बाबतींत मतभिन्नता, उलट, सुलट दोन बाजू अशा भरपूर आहेत. कटूतिखट शब्दांत त्या प्रकटहि आहेत. इतिहासकालांतच एकानें लिहिले, सखारामबापूंच्या घरीं बोलावलें तरी जाऊं नये; दुसऱ्यानें लिहिलें हा कालचक्रासहि फिरवील; आणखी एकानें सांगितलें हा पुरता लबाड व ह्याची दृष्टि धोकादायक आहे. सारांश, अशी परस्पर छेदक मतभिन्नता असली तरी चौघांच्याहि संबंधांत मतभेदातीत असा चांगुलपणाचा व कथनीय भाग आहेच, तोच या पुस्तकांत सांगण्याचा यत्न केला आहे. द्वैत असलेलीं स्थलें सांगूं नयेत असें मुळींच नाहीं. तीहि चर्चापूर्वक साधार व्यक्त केलींच पाहिजेत. पण तशा साधक-बाधक उल्लेखांची मीमांसा

करणारा हा संशोधनात्मक ग्रंथ नाहीं. निर्णयात्मक म्हणून विद्यार्थ्यांच्याकरतां जें सांगावयाचें तें सांगणारें हें पुस्तक आहे.

आमच्या दृष्टीनें अशा ऐतिहासिक म्हणी वा वाक्प्रचार बरेच आहेत व त्यांची माहिती जर ह्याप्रमाणें एकत्रित वा संदर्भानें स्वतंत्र कोणीं दिली तर महाराष्ट्राच्या भाषेतिहासार्थ व इतिहासज्ञानप्रसारार्थ ती फार उत्तम गोष्ट होईल. उदाहरणार्थ 'आम्ही कानधरली शेळी आहों'; 'आमचें पांघरुण लहान आहे.' 'मुलखाचा पाटावरवंटा होईल', 'साडेतीन राव' 'जनांत गोत' इ. इ. (ह्यांत कांहीं शिवकालीन आहेत.) ह्या म्हणींचे वा हे वाक्प्रचारांचे उलगड्यासह प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत. असो. ऐतिहासिक पत्रांतून 'तुम्ही शहाणे आहां' असा उल्लेख अनेकदां येतो. त्यांतील शहाणे म्हणजे जाणते, समंजस. धोरणी ते असा आहे. पण ह्या शहाण्या शब्दामागें संख्यावाचक अथवा क्वचित् अन्य एखादा शब्द जेव्हां योजला जातो तेव्हां त्याचा अर्थ वेगळा व उपहासगर्भ होतो. 'दीड शहाणा', 'उंटावरील शहाणा', वगैरे. तसे साडेतीन या संख्येचें नाहीं. साडेतीन ह्या आर्धीच महत्त्वास पावलेल्या संख्येमुळें (साडेतीनमुहूर्त,–वर्खें–रात्र) व सर्वपवित्र अशा ओंकार संज्ञेची दर्शक ही संख्याकृती गृहीत असल्यामुळें ह्या साडेतीन शहाण्यांची ओळखहि महत्त्वाची झाली आहे.

ह्या म्हणीमध्यें दोन-तीन गोष्टी लक्षांत घेण्या जोग्या आहेत 'साडेतीन शहाणे' ह्या वाक्प्रचारांत प्रत्यक्ष कोणा व्यक्तीचा निर्देश नाहीं. पण लगेच कोणते ते शहाणे ? असा प्रश्न मनांत येतो आणि 'सखादेवा–विठला– आणि अर्धा शहाणा नाना' असें उत्तर दिलें जातें नुसतीं हीं चारी व्यक्तिनामें सखा विठला नाना' अशीं कधींच उच्चारिलीं जात नाहींत. तर 'साडेतीन शहाणे' ह्या दोन शब्दानंतर मात्र पुढील सात शब्द सांगितले जातात. पहिलीं तीन व्यक्तिनामें आहेत आणि चौथ्याचें टोपण नांव आहे हा क्रम असाच आहे काय ? व ही म्हण केव्हां पडली आहे किंवा असावी ? पेशव्यांच्याच कडील पण पेशवाई कारभाराशीं दुजेपणानें वागणारा पहिला शहाणा. दुसरा शहाणा पेशव्यांच्या बरोबरीचा किंवा मांडलीक असलेल्या नागपूरकर भोसल्यांकडील व पेशवाईशीं वितुष्टपणें वागणारा आणि तिसरा शहणा पूर्णपणें

पेशव्यांच्या शत्रूकडे असून अर्थात् पेशवाईशीं विरुद्धपणें वागणारा. असा चढता क्रम ह्या व्यक्तित्रयगुणचिंतनिकेंत दिसून येतो. चौथा जो अर्धा शहाणा तो ह्या तिघांत बसत नाहीं.

त्याचे गुण तिघांच्या अगदीं उलट आहेत. तिघे जवळजवळ वयानें समवयस्क आणि चौथा ह्या तिघांच्याहून २५ वर्षांनीं लहान आहे. वयेंकरून त्याला अर्धा धरलेला दिसतो. गुणदृष्टया दुसरी एक मोजणी धरली जाते. पूर्ण म्हणजे जे लेखणी–व तलवार–धारक ते. ह्या दृष्टीनें पाहतां स्वारीवर असणें, योजना करणें आणि शस्त्रधारण करून पुढारी होऊन चालून जाणें ह्यांत फरक आहे. व त्यांत विठ्ठलसुंदर हा जितका शस्त्रधारी आहे तितके इतर दोन नाहींत. आणि मग नाना व इतर दोघे ह्यांत तफावत दाखविणें जड जाईल. पण ह्या सर्वांपेक्षां मुख्य मुद्दा निष्ठेचा आहे व त्यांत अर्ध्या वयाच्या नानांची निष्ठा व गुणवत्ता निरभिमानतया पाहतां अधिक आहे.

व्यक्तिविषयक म्हण पडण्यास ती व्यक्ति विद्यमान असावयास पाहिजे असें नाहीं. ह्या वेळीं व्युत्क्रमानेच येथें पाहिलें पाहिजे. विठ्ठलसुंदर हा इ. स. १७६३ मध्यें मेला. ह्या वेळीं अर्ध्या शहाण्याला महत्त्वच नव्हतें. म्हणजे साडेतीनसाठीं ही म्हण इ. १७६३ पूर्वीं निर्माण झालेली नाहीं. अलिकडल्या दोन शहाण्यांचा मृत्यु इ. स. १७८१ मधील आहे. इ. स. १७८१ पूर्वीं सखारामबापू व देवाजीपंत ह्यांच्या शहाणपणाची जशी प्रचिति आली होती तशी अर्ध्या शहाण्याचेंहि शहाणपण एव्हांपर्यंत कळलें होतें. तथापि इ स. १७८१ ते १७९६ हा नानांच्या कर्तृत्वाचा काल विशेष अभ्यसनीय आहे. म्हणून पहिल्या दोघांच्या नंतर किंबहुना त्या दोघांच्या उत्तरार्धांत ही म्हण पडली असणें संभवनीय आहे. १७९६ नंतर तर निश्चितच. पण ह्यांत आणखी एक गोम अशी आहे कीं, जी वर दर्शित केली तो म्हणजे नेमका तिघांच्या विरुद्ध हा चौथा आहे. प्रत्यक्ष वाङ्मयांत ही म्हण कोठें प्रथम आली हें पाहण्यानें वरील विधानास दुजोरा मिळेल. आणखीहि एक भाग ह्यांत असा कीं एखाद्याला जर विचारलें कीं तूं ह्यां शहाण्यांतील कोण होऊं इच्छितोस ? तर उत्तर देणें जडच जाईल. तात्पर्य ही म्हण थोडीशी उपहासगर्भ आहे आणि त्यांतील सर्वजण सांगतील कीं ‘ अस्माकं

सुचरितानि तानि त्वयोपास्यानि नो इतराणि !' व तसे थोर गुण त्या चौघांचें ठिकाणीं आहेत व म्हणून ही मंडळी ह्या म्हणीनें निराळ्या दृष्टीनें संग्रहीत केली.

ज्या ठिकाणीं संशोधनानें व अभ्यासानें नवीन नवीन माहितीची भर पडत जाते तेथें तर अद्ययावत् माहिती देणें हें मोठें अवघड काम होऊन बसतें. उदाहरणार्थ देवाजीपंत हा दुसरा शहाणा समजावयाचा कीं दिवाकर महादेव हिंगणे हा समजावयाचा असाच प्रश्न निघाला आहे. दिवाकरपंत किंवा देवाजीपंत यांच्या संबंधानें 'पुरंजन-नाटकांत' प्रारंभींच सूत्रधाराच्या तोंडीं 'देवाजी पुरुषोत्तमो गुणवतां वाणी रसास्वादवित्। तत्सभ्याः सदसद्विवेकपटवः सर्वे गुणग्राहिणः' असें वर्णन आलें आहे. विशेष कीं, लगेच 'कोण हा देवाजी' असा प्रश्न नटीनें केला 'आर्य! क एष देवाजीपंडितो यस्य प्रशंसा सर्वतः श्रूयते।' त्याचें उत्तर 'नाम्नैव दत्तमुत्तरम्' असें म्हणून 'नागनगर-नाथस्य भोसलावंशसिन्धुसम्भवराजन्यचन्द्रस्य सचिवः' असें सांगितले. आणि तें सांगतांना म्हटलें 'यदुवीरस्य उद्धव इव, रघुवीरस्य सुमन्त्र इव, सुनाशीरस्य बृहस्पतिरिव, अकब्बरसाहस्य बिरबल इव, साहसांकस्य अमर इव' आणि चंद्रगुप्तस्य चाणक्य इव' हा देवाजी आहे. अर्थात् देवाजीच्या पदरचा हा पुरंजन कवि आश्रित आहे व त्यानें आश्रयदात्याचें हें स्तवन दातृमनरंजनार्थ अतिशयोक्त केलें असणें सहज आहे. जानोजी भोसलेराजे नागपूरकर यांचे हे देवाजी मंत्री होते व धनाढ्य असून विद्वानांचे पोशिंदे होते हें ह्यावरून कळून येऊन त्यांच्या इतर उल्लेखास दुजोरा मिळतो. अशा प्रकारें इतर तिघांच्याहि विषयीं पत्रादिकांच्या साधनानें कांहीं माहिती नवीन मिळते.

श्री. देवळे यांची भाषा सोपी व आकर्षक असते तशी येथेंहि आहे. यापुढें साडेतीन रावांचीहि माहिती अशीच त्यांजकडून पुढें यावी, असें सुचवून शहाण्यांची भेट आतां उत्सुकतेनें घ्यावी असें महाराष्ट्रेतिहास-द्वारपाल विद्यार्थी ह्या नात्यानें हें विनवितों.

सारसंग्रह, पुणें ४
ता. २५-९-६३

शंकर नारायण वत्स जोशी



सखारामबापू बोकील

जुन्या काळीं साडेतीन ही संख्या फार लोकप्रिय होती. साडेतीन वस्त्रें, साडेतीन मुहूर्त, साडेतीन राव आणि साडेतीन शहाणे हे मराठेशाहींत फार प्रसिद्ध होते. सखारामबापू बोकील हे साडेतीन शहाण्यांपैकीं एक सबंध शहाणे होते. सखारामबापूंचें संपूर्ण नांव होतें सखाराम भगवंत बोकील. बापू हे सासवड जवळच्या हिवरें गांवचे राहणारे. तेथेंच त्यांचे वाडवडील भिक्षुकी व शेती करून राहत असत; मात्र केवळ या व्यवसायावरच समाधान न मानतां त्या काळच्या राजकीय उलाढालींतहि त्यांच्या वाडवडिलांनीं इतर अनेक कुटुंबियांप्रमाणें भाग घेतला होता.

शिवाजीमहाराजांच्यावर विजापूरचा सरदार अफझलखान मोठ्या तयारीनिशीं चालून आला. त्या वेळीं महाराजांच्या वतीनें अफझलखानाशीं वाटाघाटी करणारे पंताजी गोपीनाथ ह्यांच्याच घराण्यांतील सखारामबापू होत. पंताजी गोपीनाथ यांचें शिवाजी राजांजवळ फार वजन होतें. ते आणि मातोश्री जिजाबाई सोंगट्यांचा पट खेळत. त्यांच्या बहुमोल कामगिरीबद्दल वतनवाडी देऊन महाराजांनीं त्यांचा चांगलाच परामर्श घेतला. पंताजी गोपीनाथ यांच्या नंतरच्या पिढ्यांतील बोकीलमंडळी लहानमोठी कामगिरी पार पाडीत होती. बापूंचे वडील भगवंतराव थोरल्या बाजीरावांच्या कडे शिलेदार असल्याचे उल्लेख त्या वेळच्या कागदपत्रांत मिळतात. भगवंतरावांच्या वेळीं बोकील घराण्याची स्थिति जरा खालावलेली होती. सखारामबापूंना निंबाजी ऊर्फ खंडोपंत आणि बाजीराव असे आणखी दोन थोरले भाऊ होते. खंडोपंत पुरंदरच्या टांकसाळींत हवालदार होते. त्यांना महिन्याचा पगार होता फक्त चार रुपये !

सखारामबापूंचा जन्म इसवीसन १७१० ते १७१६ च्या दरम्यान झाला. लहानपणीं बापू सासवडच्या महादजीपंत पुरंदरे यांच्याकडे नोकरीस असत. “ बापू हे महादजीपंत पुरंदरे यांच्या घरचे शागीर्द परंतु श्रीमंतानीं त्यास लहानाचे मोठे केले, ” असा उल्लेख जुन्या पत्रांतून आहे. पुढें कर्तबगारीवर ते शागिर्दांचे शिलेदार झाले. शागीर्द म्हणजे गुरूच्या घरीं विद्या शिकणारा शिष्य. हा गुरूचें आसन मांडणें, वस्त्र

धुणें वगैरे कामें विद्यार्थीबुद्धीनें करी. पुढें शागीर्द शब्दाला केवळ धोतराच्या निऱ्या करणारा, उपकर्णी घासणारा एवढाच अर्थ चिकटला. विद्या शिकणारा उमेदवार म्हणजे शागीर्द. शागीर्द म्हणजे पाणक्या नव्हे.

लहानपणापासूनच सखाराम बापू चाणाक्ष, तरतरीत, हुशार आणि समयसूचक होते. पुरंदऱ्यांच्याकडे श्रीमंत पेशवे सरकारांचें येणें-जाणें खूपच असे. एकदां थोरले बाजीराव पुरंदऱ्यांकडे मेजवानीस आले. जेवणाचा थाट खूप केला होता. पण बाजीरावांची आवडती तिळाची चटणी मात्र करावयाची विसरली होती. चटणी कां केली नाहीं? असें बाजीरावांनीं विचारतांच पुरंदरे गडबडले; पण बापूंनीं प्रसंगावधान राखून आदबीनें उत्तर दिलें कीं, "आज रविवार आहे. त्यामुळें तीळ, मध, मांस वगैरे चार पदार्थ शास्त्राधारें वर्ज्य आहेत! म्हणून तिळाची चटणी केलेली नाहीं!" बापूंचा हजरजबाबीपणा पाहून बाजीराव खूष झाले. त्यांनीं पुरंदरे यांजकडे त्यांच्याविषयीं चौकशी केली आणि त्यांना पुरंदऱ्यांकडून मागून घेतलें. बापू सासवडहून पुण्यास आले! पुणें हें त्या काळीं हिंदुस्थानवर दरारा गाजविणारें शहर! तेथें कर्तबगारी दाखवायला वाव भरपूर होता. सासवडहून पुण्यास आल्यावर बापूंना सदाशिवरावभाऊ, नानासाहेब, रघुनाथराव यांच्याबरोबर शिक्षणाचा फायदा मिळाला. दरबारी कामकाज जवळून पाहण्याची संधि मिळाली. या संधीचा फायदा बापूंनीं पुरेपूर घेतला. त्यांनीं आपल्या कामकाजांत यत्किंचितहि आळस होऊं दिला नाहीं. त्या वेळीं पुण्याला शनिवारवाडा बांधण्याचें काम थोरल्या बाजीरावांनीं सुरू केलें. इ. सन १७३२ मध्यें शनिवारवाड्याच्या बांधकामावर देखरेखीसाठीं त्यांची कारकून म्हणून नेमणूक झाल्याचा उल्लेख आहे. मात्र कारकुनी कामांत ते फारसे रमले नाहींत. थोरले बाजीरावसाहेब आणि पुरंदरे यांच्या हाताखालीं त्यानीं स्वाऱ्या शिकारींत व निरनिराळ्या मोहिमांत भाग घ्यायला सुरुवात केली. बाजीरावसाहेबांची घोडदौड चौफेर चाललेली असे. ह्या घोडदौडींत त्यांच्या बरोबर बापूंनीं माळवा, राजस्थान पायांखालीं घातलें, आणि काशी, प्रयाग, गया या प्रदेशापर्यंत यात्रा केल्या. थोरल्या बाजीरावाचें लढण्याचें एक तडफदार तंत्र होतें. बापूंनीं

तें सारें पाहिलें, अनुभविलें आणि त्यांतून त्यांचें शिक्षण झालें. कारकुनी-बरोबरच युद्धकलेंतहि ते तरबेज झाले. स्वारीवरचा त्रास बापू बिलकूल मानीत नसत. जिथें ते जात, तिथें ते आनंदांत दिवस घालवीत. इ. स. १७४१ व इ. स. १७४४ या दोन वेळीं बापू उत्तर हिंदुस्थानांत मोहिमांवर गेले होते.

बाजीराव पेशव्यांच्या पश्चात नानासाहेब पेशवे यांनींहि सखाराम-बापूंच्या कर्तबगारीचा उपयोग करून घेतला. इ. स. १७४६–४७ मध्यें पेशव्यांनीं सदाशिवराव भाऊंच्याबरोबर दक्षिणेंत कर्नाटकांत सैन्य पाठविलें. त्या वेळीं बापूंना मुख्य कारभारी म्हणून नेमण्यांत आले होते. बापूंनीं आपलें काम चोख केलें. सावनूरच्या नबाबाचा त्यांनीं पराभव केला. निजामाचा मुलगा नासिरजंग याचाहि त्यांनीं पराभव केला. बहादूर भेंड्यांचा किल्ला त्यांनीं घेतला. एकंदर मोहिमेंत सैन्याच्या जलद हालचाली, त्यांना सामानसुमान व रसद यांचा व्यवस्थित पुरवठा करणें इत्यादि सर्व बापूंनीं कसोशीनें केलें. मोहिमेंत बरीच संपत्ति त्यांच्या हातीं लागली. त्यांची एकंदर हुशारी पाहून नानासाहेब पेशवे व शाहूमहाराज यांना संतोष झाला. एके काळीं महादोबा पुरंदरे यांच्याकडे शागीर्दपणानें राहणाऱ्या सखारामपंतबापूंना वार्षिक पंचवीसशें रुपयांचा तनखा झाला आणि एक गांव इनाम मिळाला !

शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर खूप भानगडी झाल्या. पुरंदरे आणि पेशवे यांचें बिनसलें. सदाशिवरावभाऊ रुसून कोल्हापूरच्या छत्रपतीं-कडे जायला निघाले ! नानासाहेब पेशव्यांना बापूंबद्दलहि काळजी वाटूं लागली होती. पण ती खोटी ठरली. पेशव्यांनीं बापूंना रघुनाथरावांच्या बरोबर गुजराथमध्यें मोहिमेवर पाठविलें. गायकवाडांबरोबर समेट करून बापूंनीं गुजराथची मोहीम यशस्वी केली. अहमदाबादचा किल्ला घेतला आणि शिबंदीसाठीं गायकवाडांकडून दरसाल सहा लक्ष रुपये ठरवून घेतले.

इ. स. १७५२ मध्यें दिल्लीचे मोगल बादशाहा व मराठे यांच्या दरम्यान एक करार झाला. त्याला ‘ अहदनामा ’ म्हणतात. त्या कराराप्रमाणें मराठ्यांनीं मोगलपादशाहीच्या रक्षणाची जबाबदारी उचलली. याच्या मोबदल्यांत मराठ्यांना राजपुताना, सिंध, पंजाब, माळवा, रोहिल-

खंड यांत चौथाई सरदेशमुखी वसूल करण्याचा हक्क मिळाला. मोगल बादशाहीला रोहिले, पठाण, अब्दाली असे देशीपरदेशी अनेक शत्रू होते. त्यांच्या बंदोबस्तासाठीं नानासाहेब पेशवे यांनीं राघोबादादांची नेमणूक केली व सखाराम बापूंना उत्तरेंतील स्वारींचे मुख्य कारभारी नेमलें. या नवीन कामगिरीवर राघोबा व बापू गुजराथमधून परस्पर गेले. होळकर आणि शिंदे यांच्या बरोबरीनें त्यांनीं कामगिरी पार पाडली. कुंभेरीला जाट शरण आले. कुंभेरीच्या मोहिमेंत मराठ्यांचे प्रमुख सरदार शिंदे आणि होळकर यांचें वितुष्ट प्रकट झालें. दुर्दैवानें रघुनाथराव किंवा बापू त्या दोघांच्यावरहि आपली सत्ता गाजवूं शकले नाहींत. उत्तरेंत कामें पुष्कळच होतीं. मोगल प्रदेशांत स्थिरस्थावर करावयाचें होतें. काशी, प्रयाग इत्यादि क्षेत्रें सोडवावयाचीं होतीं. राजपुतान्यांत शांतता स्थापन करायची होती. भरपूर सैन्य असूनहि जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांचीं मनें त्यांना आपल्याकडे वळवून घेतां आलीं नाहींत. सर्वच कामें अपुरीं राहिलीं. रघुनाथराव व सखारामबापू परत आले. त्यांच्या मागोमाग अब्दालीची स्वारी आली. दिल्ली, आग्रा, मथुरा यांची लूट झाली! मोठाल्या कत्तली झाल्या. अहदनाम्यांत कबूल केल्याप्रमाणें रघुनाथराव फौजेसुद्धां दुसऱ्यांदा उत्तरेस निघाले! बापू हेच पुनः त्यांच्या स्वारीचे मुख्य कारभारी होते. अब्दाली जातांच त्यांनीं पुनः सर्वत्र आपला अंमल बजावला. पंजाब प्रांतावर अब्दालीचा मुलगा अंमल चालवीत असे. त्याच्यावर मोहिमा काढण्यांत आल्या. तो पळाला त्यांचा पाठलाग बापूंनीं अटकेपर्यंत केला! अटकेवर मराठ्यांचे झेंडे लागले! मोठेपणाचा अगदीं कळस झाला! "हिंदुस्थानचें अधिराज्य" करण्याची भाषा सुरूं झाली. शाहीर कवनें गाऊं लागले. शाहीर प्रभाकर म्हणतो.

> **"फेडून नवस माहोरास,**
> **गेले लाहोरास,**
> **जिंकित झेंडे!**
> **अरे त्यांनीं अटकेंत**
> **पाव घटकेंत**
> **लाविले झेंडे"**

हें सर्व घडविण्यांत सखारामबापूंचा वाटा फार मोठा होता. पेशव्यांच्या दरबारांत त्यांचें वजन वाढलें होतें.

१७६१ सालीं पानिपतला मराठ्यांचा पराभव झाला! कर्ती माणसें गमावलीं. त्या धक्क्यानें नानासाहेब पेशवे वारले. मोठमोठीं संकटें आलीं. निजाम व हैदर हे शत्रू कारवाया करूं लागले. रघुनाथरावांची भाऊबंदकी सुरू झाली!

माधवरावांनीं कर्तबगारीनें कारभार करून विस्कटलेली घडी बसवीत आणली. निजामाशीं युद्ध होऊन तह झाला. हैदरावर तर तीन मोहिमा झाल्या. त्या सर्वांत सखाराम बापू होते. थोरल्या माधवराव पेशव्यानें सैन्याची जुळवाजुळव केली आणि इ. स. १७६३ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर हैदरच्या रोखानें कूच केलें. या स्वारींत माधवरावानें सखारामबापूंना मुद्दाम आपल्याबरोबर घेतलें होतें; कारण त्यांना कर्नाटकच्या प्रदेशाची आणि तिकडील व्यक्तींची माहिती होती. माधवराव पुण्याहून विजापुरास, तेथून बेळगांवास, तेथून मनोळीस आणि तेथून सावनूरास आले आणि हैदरअलीच्या राज्यावर मोर्चे बांधून बसले.

मराठ्यांच्या स्वारीला तोंड कसें द्यायचें, याचा हैदरअली विचार करीत होता. मीर फैजुल्ला यास तुंगभद्रेच्या आसपास टेहळणीवर पाठवून तो स्वतः अनवडी येथें दाट जंगलाच्या आश्रयानें छावणी देऊन राहिला.

हैदरची बुद्धिमत्ता फार तीक्ष्ण होती. त्याची स्मरणशक्ति दांडगी होती. तो अष्टावधानी होता. म्हणजे तो एकाच वेळीं अनेक कामांत लक्ष घालूं शके. सकाळीं तो आपल्या छावणींत तोंड धूत असतां बाजूला अनेक दूत उभे असत. आपण काढलेली बातमी ते हैदरअलीला सांगत. एकाच वेळीं अनेक दूत बोलत आणि हैदर त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन, जरूर तेथें त्यांना जास्त माहिती विचारी. मध्येंच एखाद्यानें प्रश्न विचारल्यास त्याला तो त्वरित उत्तरहि देई. आज दूतांनीं मराठ्यांच्या गोटांतल्या बातम्या आणल्या होत्या.

एक दूत म्हणाला, " मराठ्यांचें सैन्य जय्यत तयारी करून आपल्या राज्याच्या रोखानें येत आहे. "

दुसरा दूत सांगत होता, " सैन्याबरोबर खास पंतप्रधान माधवराव पेशवे हेहि येत आहेत. "

तिसऱ्यानें बातमी दिली, "......आणि ते आपल्याबरोबर पेशवाईंतील साडेतीन शहाण्यांपैकीं एक, सखारामबापू बोकील यांना आणीत आहेत. त्यांच्याबरोबरचें सैन्य सावनूरच्या पुढें दोन मैलांवर येऊन ठेपलें आहे. सखारामबापूंना आपल्या सरहद्दीवरील प्रदेशांची खडान् खडा माहिती असल्यानें पेशव्यानें त्यांना मुद्दाम बरोबर आणले आहे. पण मीं असं ऐकलं आहे कीं, सखारामबापूंचा कल पेशव्यांपेक्षां त्याच्या चुलत्याकडे—राघोबाकडे—अधिक म्हणून सखारामबापूंचा मोहरा आपल्या बाजूला वळवितां आल्यास ही मोहीम आपणांस जड जाणार नाहीं ! "

इतक्यांत एक हेर हैदरच्या अगदीं जवळ गेला आणि त्याच्या कानांत कुजबुजला, " हुजूर, मला अशी एक बातमी मिळाली आहे कीं, मराठी सैन्यास गेल्या दोनतीन महिन्यांत पगार मिळालेला नाहीं आणि त्यामुळें मराठी सैन्याचें लढण्याकडे मनापासून लक्ष नाहीं. "

हैदरअलीनें आपल्या दूतांजवळ आणखी कांहीं चौकशी केली आणि मराठी सैन्यांतील इत्थंभूत बातमी रोज मिळाली पाहिजे, असें दूतांना आणि हेरांना निक्षून सांगून त्यांना निरोप दिला.

मराठ्यांच्या सैन्याच्या आणि हैदरच्या सैन्याच्या चकमकी सुरू होत्या. एकमेकांचे डाव आणि प्रतिडाव चालू होते. सावनूरचा नबाब मुसलमान असूनहि तो मराठ्यांना सामील झाला, याबद्दल हैदरला अत्यंत संताप आला. " तुझें संरक्षण मराठे कसें करतात, तें पाहतों, " अशा ईर्षेनें हैदरअलीनें आपली फौज आजूबाजूला जंगलें, नद्या, टेकड्या यांच्या आश्रयानें व्यवस्थित मांडली.

पावसाळा सुरू होण्याचे दिवस होते. मराठ्यांचें सैन्य पुण्याहून निघून आठनऊ महिने झाले होते. तेव्हां पावसाळ्याच्या सुमारास मराठे थोडेफार परत गेल्यास सावनूरचा सूड घेण्याचा हैदरअलीचा बेत होता, तर पानिपतच्या पराभवानें किंवा कुटुंबांतील भांडणामुळें पेशव्यांचें सामर्थ्य

यत्किंचितहि कमी झालें नाहीं, हें हैदरअलीला दाखवून कर्नाटकांत पुनः आपलें बस्तान बसविण्याचा माधवराव पेशव्यांचा बेत होता, हैदर आणि मराठे दोघेहि गनिमीकाव्याच्या युद्धपद्धतीचा उपयोग करीत होते आणि आपल्याजवळच्या तोफांचा उपयोग एकमेकांना हैराण करण्यास करीत होते.

सावनूरच्या आसपास मराठ्यांचा तळ पडला होता. स्वार, शिबंदी, पायदळ, बरकंदाज यांनीं आपल्या जागा नेमून तळ दिले होते. तंबू, डेरे, राहुट्या आणि कनाती उभारण्यांत आल्या होत्या. मैदानाची जागा पाहून तेथें दरबारचे तंबू दिले होते. पिछाडीच्या बाजूस वृक्षांच्या गार छायेखालीं खाशा स्वारीचे आणि मुदपाकखान्याचे तंबू दिले होते. छावणीच्या पूर्व बाजूला म्हणजे आघाडीला विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, धायगुडे, रास्ते, बिनीवाले आणि कानडे वगैरे सरदारांचे तंबू होते. त्याला लागूनच सखारामबापूंचा तंबू होता. त्या तंबूच्या आंतमध्यें गालिचा अंथरला होता. जवळच बसायची बैठक होती. संध्याकाळची वेळ होती. तंबूंत सखारामबापू इकडे तिकडे येरझारा घालीत होते. ते बांध्यानें थोडे सडपातळच होते. त्यांच्या कपाळीं चंदनाचें कस्तुरी-मिश्रित असें गंध आडवें लावलेलें होतें. त्यांच्या अंगावर उंची वस्त्रें होतीं. जवळच एक शेगडी पेटविलेली होती. नारायणतेल चोळलेला आपला पाय बापू मधून मधून शेकत होते. इकडे तिकडे येरझारा घालतां घालतां त्यांच्या कानांवर लांबून कोठून तरी एका फकिराची साद आली: “ दिया सोही दाता ऽ नही दिया सोही दाता ऽ ऽ अल्ला सबका भला करेगा ! ”

हा आवाज ऐकतांच सखारामबापूंनीं तंबूच्या बाहेर डोकावून पाहिलें, तर एक फकीर. कमरेला चौकटीचौकटीची एक लुंगी गुंडाळलेली आहे, अंगांत मळकट रंगाची दिसणारी जुनाट कफनी घातली आहे, डोक्याला एक काळें फडकें बांधले आहे, खांद्याला एक झोळी अडकवलेली आहे, एका हातांत पेटविलेल्या दोन उदबत्त्या आहेत आणि दुसऱ्या हातांतील लोखंडी चिमटा खळ्ळ् खळ्ळ् वाजवीत तो मध्यम वयाचा फकीर चालला आहे. आसपासच्या छावणींतील कोणी

शिपाईप्यादे त्यास शिवराई, दोन शिवराई भिक्षा घालीत आहेत, तर त्यांस तो 'अल्ला तेरा भला करेगा!' असा तोंडभर आशीर्वाद देत आहे.

हा सारा प्रकार सखारामबापूंनीं आपल्या छावणींतून जरा निरखून पाहिला तर त्यांना त्या फकिराचीं पावलें तालावर पडत आहेत, आणि पाऊलवाटेनें जात असतां तो बारकाईनें टेहळणी करीत जात आहे, असें दिसून आलें. आघाडीवरच्या साऱ्या छावण्या ओलांडून हा इतक्या आंत आला कसा? असा त्यांना संशय आला आणि त्यांनीं दारावरच्या पहारेकऱ्यास सांगितलें, "जा रे. त्या समोरून चाललेल्या फकिराला इकडे बोलावून आणा. तो न आला, तर त्याला पकडून आणा."

रखवालदारानें वेगानें जाऊन फकिराला बोलावतांच तोहि "दिया सोही दाता ऽ नही दिया सोही दाता ऽऽ" अशी साद घालीत आणि हातांतील लोखंडी चिमट्यांचा ताल धरीत सखारामबापूंच्या डेऱ्यांशीं आला. सखारामबापूंनीं त्याला आंत बोलाविलें, बैठकीवर बसायला सांगितलें आणि त्याच्याकडे तो रोखून पाहूं लागला. फकिराच्या डोळ्यांत निर्विकारपणा दिसत होता. तो ओठांनीं कांहींतरी पुटपुटत होता आणि हाताच्या बोटांनीं माळेचे मणी थोड्या वेगानेंच सरकवीत होता. इकडे सखारामबापूंनीं आपल्याजवळच्या दोनचार तसबिरी काढून त्यांतील चेहऱ्याशीं फकिराचा चेहरा ताडायला सुरुवात केली. म्हाताऱ्या असफजहाच्या पांढऱ्या भरदार दाढीशीं फकिराची काळी आणि टोकदार दाढी जुळत नव्हती.

"अरे हो! पण हैदरअलीच्या तसबिरीशीं या फकिराचा चेहरा जुळूं लागला. तसाच काळाकुट्ट रंग, तसेच रेखीव डोळे, अगदीं टोकदार दाढी, आतां तसबिरींतली काळी तर फकिराची पांढुरकी, पण ती मुद्दाम कांहींतरी पांढरं फासलेली दिसते! डोळ्यांखालच्या आणि गालाच्या कडेला असलेल्या त्या दोन रेषासुद्धां जमल्या, तीच किंचित् उंच मान आणि थोडी लहान अशी हनुवटी!" फकिराचा चेहरा हैदरच्या चेहऱ्याशीं जुळतांच सखारामबापू कांहींशा कठोर आवाजांत

म्हणाले, "बोल, तूं फकीर नसून हैदर आहेस कीं नाहींस ? मीं तुला बरोबर पकडलें आहे..."

आपला खालचा ओठ दांतांखालीं किंचित् चावून फकीर थंड स्वरांत म्हणाला, "होय. मीच हैदरअली आहे !"

तें ऐकतांच सखारामबापू एकदम गरजले, "कोण आहे रे तिकडे ? या मौलवीला पकडा आणि शेजारच्या तंबूंत बंदोबस्तानं ठेवा."

त्यासरशीं चार शिबंदी धांवून आले. त्यांनीं त्या मौलवीला पकडले आणि शेजारच्या तंबूंत नेऊन बंदोबस्तांत ठेवले. या वेळीं एक शिबंदी मधून मधून त्या मौलवीकडे व मधून मधून सखारामबापूंकडे बारकाईनें पाहात होता.

सखारामबापू उठले. त्यांनीं आपला डावा हात डोक्यावरून फिरविला. त्यांचें विचारचक्र चालू झालें. त्यांनीं आपले दोन्ही हात मागें नेले. डाव्या हाताच्या पंजांत उजव्या हाताचें मनगट पकडलें. उजवा हात घट्ट मिटला आणि पुनः मोकळा केला. विचारांच्या लहरी त्यांच्या डोक्यांत मावेनात. ते तंबूंत येरझारा घालूं लागले. त्यांचे चर्मचक्षु समोर पाहात होते; पण अंतश्चक्षु रणांगणावर जाऊन दोन्ही पक्षांचें बलाबल अजमावीत होतें. "हैदरचें सैन्य किती आहे ? त्या सैन्याची निष्ठा किती आहे ? हैदरला आपण पकडलें आणि पेशव्यांकडे नेलें नाहीं, तर ही वार्ता गुप्त राहील काय ? छे ! तें अशक्य ! हैदरअलीला माधवरावासमोर उभा केला तर काय होईल ? माधवराव धोरणी आणि करारी खरा ! पण धोरणीपणापेक्षां करारीपणाच अधिक ! हैदरअलीला एकदां रावसाहेबांपुढें नेल्यावर मग आपल्याला कांहीं करतां येईल काय ?......छे ! काय करावें कांहींच कळत नाहीं. बुद्धि बेअंदाज हेलकावे खात आहे. आतां श्रीसिद्धेश्वराला स्मरून जें सुचेल तें करावें झालें !"

याप्रमाणें बोलतां बोलतां सखारामबापूंनीं मनाशीं कांहीं निश्चय केला आणि टाळी वाजविली. त्यासरशीं एक हुजऱ्या आंत आला. बापू

म्हणाले, " जा, मघांशीं गिरफदार केलेल्या त्या मौलवीला आंत घेऊन ये आणि तूं बाहेर उभा राहा ! "

" हं, मग काय करणार आतां तुम्ही माझं ? " मौलवीनें थंड-पणानें विचारलें.

" काय करणार म्हणजे, तुला जेरबंद करून रावसाहेब पेशव्यांपुढें हजर करणार ! "

" त्यामुळें काय होणार ? " मौलवी.

" तें रावसाहेब पाहून घेतील ! " सखारामबापू.

" पण असं पाहा. तुम्हीं मला जरी पकडलंत, तरी माझं सैन्य कांहीं परत फिरणार नाहीं. तें सर्व आघाडीवर तुमच्याशीं लढतच राहणार. त्यापेक्षां तुम्ही लागेल तें मागा. मी तें देतों. मग माझी सुटका करा. " मौलवीनें युक्तिवाद केला.

" द्या तर दोन लाख रुपये ! "

" दोन लाख देतों; मग करतां सुटका ? "

" नुसता हवाला चालायचा नाहीं, रोख पैसा मोजाल तर विचार करूं. "

हैदर पडला अशिक्षित. त्याला लिहायला थोडेंच येत होतें ? पण तो मोठा वस्ताद होता. त्यानें आपल्या झोळींतून खुणेचे दोन दगड काढले. ते खांद्यावरील एका चौकटीच्या रुमालांत बांधले. मग तो म्हणाला, " हां ! हें घ्या आणि येथून पूर्वेला सुमारें दोन-अडीच मैलांवर मायन-हळ्ळीच्या अलीकडे एक सहुटी आहे, तेथें हें नेऊन द्या आणि दोन लाख रुपये घेऊन या. "

सखारामबापूनें स्वार पाठविले, पैसे पदरांत पाडून घेतले आणि फकिराची सुटका केली. हें होईतों बरीच रात्र झाली.

दुसऱ्या दिवशीं पुनः लढाई सुरू झाली. हैदरअलीनें एका बाजूनें तहाचा देखावा चालू ठेवला आणि दुसरीकडून सावनूर काबीज करण्याच्या धडाका सुरू ठेवला.

तीनचार दिवस गेले. माधवराव पेशवे यांनीं सखारामबापूंना आपल्या तंबूंत बोलावून घेतलें आणि खास एकान्तांत गांठ घेऊन त्यांना निक्षून विचारलें, " तुम्ही दोन गुन्हे केले आहेत कीं नाहींत ? केले असतील तर तुम्ही शिक्षेस तयार व्हायला पाहिजे. "

" गुन्हयांचा उच्चार व्हावा. सत्य असतील, तर सेवक प्रायश्चित्तास तयार आहे ! " बापू म्हणाले.

त्यावर माधवराव कांहींशा कठोरपणानेंच म्हणाले, " मराठ्यांचा प्रस्तुतचा शत्रु हैदरअली हा फकिराच्या वेषानें तुमच्या हातीं लागला असतां, तुम्ही त्याची सुटका केलीत, हा एक अपराध ! आणि या कामीं तुम्ही दोन लाख रुपये लांच खाल्लीत, हा दुसरा गुन्हा ! बोला, आतां तुमचें काय म्हणणें आहे तें ? "

सखारामबापू संथपणें म्हणाले, " श्रीमंतांचा पहिला आरोप मला मान्य आहे. पण त्या बाबतींत माझें म्हणणें असें—हैदरखानासारखा मोहरा हातीं लागला असतां, त्यावर उपकाराचें ओझें करून सोडावें, हें उचित ! शिवाय अशा वेळीं माझ्यासमोर पगाराची बाकी थकलेली मराठ्यांची फौज होती. हैदरला ठार मारण्याऐवजीं कांहीं पैसा हातीं लागतो कीं काय ? इकडे माझें लक्ष होतें. हैदरअलीकडून मीं दोन लक्ष रुपये घेतले ही गोष्ट खरी आहे, पण मी तो सारा पैसा यापूर्वींच सरकारांत जमा केला आहे. मराठयांच्या सैन्यांतील सैनिकांना पगार देतां यावा, मराठयांची फौज पोसली जावी, तिला लढायला जोर यावा, यासाठींच मीं हा सारा प्रपंच केला. या सर्व उद्योगाबद्दल आपण द्याल ती शिक्षा भोगयला मी तयार आहे. "

यावर माधवराव पेशव्यांनीं कांहीं न बोलतांच सखारामबापूंना निरोप दिला. अखेर कर्नाटकांतील या युद्धांत हैदरअली जेरीला आला. त्यानें माघार घेऊन तहासाठीं बोलणें लावलें. तेव्हां पेशव्यांतर्फे सखारामबापू आणि हैदरअलीच्या वतीनें अप्पाजीराव यांच्यामध्यें बरीच चर्चा आणि वाटघ ाटी होऊन शेवटीं मराठ्यांना अनुकूल असा तह ठरला. या तहांत,

तुंगभद्रेच्या उत्तरेचा मुलूख हैदरनें सोडावा आणि मराठयांना तीन लाख रुपये खंडणी द्यावी असें ठरलें.

हैदरवरील स्वारींतील बापूंच्या कामगिरीबद्दल खूष होऊन माधवराव पेशव्यांनीं मौजे पिंपळें, चांबळी वगैरे कऱ्हे पठारावरील चार गांवांतील जमीन सखारामबापूंना इनाम दिली. बक्षीसपत्रांत माधवराव पेशव्यांनीं लिहिलें : " सखारामबापू हे राज्यांतील पुरातन सेवक. त्यांनीं स्वामिसेवा एकनिष्ठपणें बहुत दिवस केली. यास्तव त्यांचें चालविणें म्हणून हें बक्षीस दिलें. "

अशा प्रकारें हैदरवरील या मोहिमेंत माधवराव पेशव्यांना सखारामबापूंचा उपयोग झाला. पण पुढें त्यांचें माधवरावांशीं न पटल्यामुळें व सखारामबापूंचा ओढा रघुनाथरावांच्याकडे असल्यानें माधवरावांनीं त्यांना कारभारी पदावरून दूर केलें ! सखारामबापूंचा सल्ला माधवराव वारंवार विचारीत. मात्र त्यांना ते पक्के ओळखून होते.

माधवराव एकदां कांहीं कागद जाळीत बसले असतां सखाराम बापू तेथें गेले. " काय जाळतां ? " असें बापूंनीं माधवरावांना विचारतांच ते म्हणाले, " मी फितुरींचे कागद जाळीत आहे. "

" असे कागद पुराव्यासाठीं जरूर रक्षावें, " असें बापूंनीं म्हणतांच माधवरावांनीं ढिगाऱ्यांतील एक पत्र बापूंच्या हातीं दिलें ! तें खुद्द त्यांनींच लिहिलें होतें. तें पाहतांच बापूंचा नूर एकदम उतरला ! श्रीमंत म्हणाले, " बापू असेंहि कागद ठेवावेत काय ? " बापू कांहीं बोलले नाहींत. माधवराव होते तोंपर्यंत त्यांनीं मग फारशी खटपट केली नाहीं. झाकली मूठ सव्वा लाखाची ! म्हणून श्रीमंत विचारतील तेव्हां ते सल्लामसलत तेवढी देत.

माधवरावानें आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं सखारामबापूंना पुनः विश्वासांत घेतलें. त्यांच्या व रघुनाथरावांच्या हातीं त्यांनीं अल्पवयी नारायणरावांना दिलें. मागील सर्व भांडणें विसरून राज्याचें हित साधावें, असें त्यांनीं दोघांना सांगितलें. कर्नाटकांतील तिसऱ्या मोहिमेवरून परत आल्यावर माधवरावांनीं बापूंना पुनः कारभारी म्हणून नेमलें. नंतर माधव-

रावांची प्रकृति बिघडून ते आजारी झाले. आजारीपणांत सखारामबापू माधवरावांची सेवा-सुश्रूषा करीत व स्वतः औषधोपचार करीत, असा उल्लेख ऐतिहासिक पत्रांमधून मिळतो. माधवरावांचा मृत्यू होण्याआधीं त्यांनीं एक नऊ कलमी यादी बापू व नाना यांना दिली. त्या यादीवर "कलमाप्रमाणें वर्तणूक श्रीगणपतीची शफतपूर्वक करूं," असें लिहून ती बापूंनीं माधवरावांना परत दिली. या यादींत राज्याचें रक्षण, कर्ज-निवारण, काशी-प्रयाग क्षेत्रें मोकळी करणें इत्यादि कलमें होतीं.

माधवराव अकालीं वारले ! पेशव्यांच्या घरांत भाऊबंदकी जोरांत सुरू झाली. तिचा परिणाम म्हणून नारायणराव पेशवे यांचा खून झाला. शनिवारवाड्यांत शिरून गार्दी दंगा करीत असल्याची बातमी वणव्या-सारखी पुण्यांत पसरली. या बातमीनें शहरांतील लोक घाबरून गेले, बाजार दुकानें बंद झालीं. रस्त्यांवर लोकांची पळापळ सुरू झाली. मोठा संकट प्रसंग आला. या आणीबाणीच्या वेळीं सखारामबापू, नाना फडणीस, त्रिंबकराव मामा पेठे, मोरोबादादा फडणीस आणि इतर सरदार आणि कारभारी कोतवाल चावडींत जमा झाले. त्यांनीं स्वार व फौज जमा करून शहराची नाकेबंदी केली. चौक्या पहारे उभ्या करून लोकांत धीराचें वातावरण निर्माण केलें.

पण शनिवारवाडा गार्द्यांच्या ताब्यांत होता. वाड्यावर तोफा डागून गार्द्यांचा बंदोबस्त करावयाचा; पण शनिवारवाड्यांत पेशव्यांच्या स्त्रिया व आप्त मंडळी असल्यानें शेवटीं हा विचार सोडून द्यावा लागला. बाहेर मंडळी पेंचांत पडली होती. अशा वेळीं शनिवारवाड्यांतून सखाराम-बापूंना खुद्द दादासाहेबांची चिठ्ठी आली. चिठ्ठींत लिहिलें होतें कीं, "१...चिरंजीवराव गार्द्यांच्या कटकटींत मारले गेले. मीहि त्यांच्या कैदेंत आहे. तुम्ही आंत येऊन भेटावें."

चिठ्ठी मिळाल्यावर इतर मंडळींच्या विचारानें सखारामबापू शनिवार-वाड्यांत दादासाहेब यांना भेटावयास गेले.

शनिवारवाड्यांतील दृश्य पाहून बापू थक्क झाले. गार्द्यांनीं केलेल्या कत्तलीच्या खुणा ठिकठिकाणीं दिसत होत्या. सामान अस्ताव्यस्त

पडलेलें होतें. मुख्य दारांत नेहमींच्या पहारेकऱ्यांचे पहारे नव्हते. त्यांतील दोन-चार जणांचे मुडदे रस्त्यांत पडलेले होते. जागोजागीं गार्दी नंग्या तरवारी घेऊन पहाऱ्यास उभे होते. कुठें कुणबीण मरून पडलेली होती. कुठें गाय रक्ताच्या थारोळ्यांत पडलेली होती. सखाराम-बापू दादांच्या खोलीकडे आले. दादासाहेब डोक्याला हात लावून बसले होते. समोर नारायणराव पेशव्यांच्या शरीराचे तुकडे तुकडे पडलेले होते. रडारडीचा कल्लोळ उडला होता. मधूनच कुणीतरी दादासाहेबांच्या नांवाचा जयजयकार करीत होते. आंतील हें सर्व पाहून सखाराम-बापूंना अतिशय वाईट वाटलें. ते दादासाहेब यांना खेदानें म्हणाले, " आमचे शरीरीं समाधान नाहीं. आम्ही घरास जातों. कारभाराचे धनी फडणीस आहेत. त्यांना बोलावून आणून कारभार करावा ! "

निरोप घेऊन बापू शनिवारवाड्यांतून बाहेर पडले. या सर्व प्रकारानें बापूंना धक्का बसला. त्यांनीं नाना फडणीसांच्या सल्ल्यानें बारभाई कारस्थान उभे करून दादासाहेबांचा बंदोबस्त केला.

सवाई माधवरावांच्या कारकीर्दींत नाना आणि बापू हे दोघेहि कारभार पहात. दोघांत लहान-मोठेपणा राहूं नये म्हणून प्रत्येक आर्थिक बाबीवर नाना फडणीस ' देवविणें ' असा शेरा मारून शिफारस करीत आणि मग ' देणें ' असा शेरा लिहून बापू ती बाब पूर्ण करीत. नानांनीं व बापूंनीं छोट्या पेशव्यांचें संगोपन केलें. इंग्रजांशीं युद्धप्रसंग केले. त्यांना दाद लागून दिली नाहीं. पुरंदरचा तह व वडगांवची लढाई हीं त्यांच्या कर्तबगारीचीं उदाहरणें देतां येतील. पण बापूंचा ओढा मात्र रघुनाथरावांच्याकडेच जास्त होता.

वडगांवला इंग्रजांशीं तह झाला. त्या तहाप्रमाणें इंग्रजांनीं रघुनाथ-रावांना महादजी शिंदे यांच्या ताब्यांत दिलें. नानांनीं व शिंदे यांनीं फितूर मंडळींच्या बंदोबस्ताची मोहिमच काढली. त्यांत नारायणरावांचे मारेकरी मारले. दादांचे कारभारी चिंतो विठ्ठल राईरीकर यांनाहि त्यांनीं पकडलें ! चिंतो विठ्ठल यांच्याकडून सखारामबापूंच्या फितुरीची माहिती महादजी शिंदे यांना मिळाली. शिंद्यांनीं राईरीकर व दादासाहेब

यांच्याशीं गोडीनें वागून त्यांच्या पोटांत शिरून सर्व माहिती काढून घेतली; एवढेंच नव्हे तर बापूंच्या हातच्या फितुरीच्या चिठ्याहि त्यांना मिळाल्या. चिठ्ठींत मजकूर होता कीं..." विनंती उपरी, दक्षिणेकडे (हैदर अल्लीकडे) सूचना केली आहे. आम्हीहि पाय पसरून बसलों आहों. अशांत जलदी कराल तितकी उपयोगी आहे..." शिंदे व नाना फडणीस यांनीं सखारामबापूंना त्यांच्या फितुरी कारवायांबद्दल कैद केलें. त्यांची जहागिरी, जवाहीर, घोडीं सर्व सरकारजमा झाली. घरदार, वाडे, बागा, पागा या सर्वांच्या जप्तीची किंमत सुमारें साठ लाख रुपये झाली. ते सर्व सरकारजमा झाले. नानाफडणींसानें बापूंच्या जिंदगीची विल्हेवाट लावली. केवळ फितुरीबद्दल बापूंना ही शिक्षा देण्यांत आली.

सखारामबापू कैदेंत असतांना हरीपंतांनीं त्यांची गांठ घेतली. कैदेंतून सुटका करून पुनः कारभार हातीं घेतल्यास त्यांना मदत-करण्यास बरेचजण तयार असल्याचेंहि त्यांनीं बापूंच्या कानांवर घातले. परंतु अशा भानगडींत बापू पडले नाहींत. "म्हातारपण झाल्यामुळें आतां आपणांस सर्व गोष्टींचा वीट आला आहे. कारभाराची दगदग आतां नको," असें त्यांनीं उत्तर दिलें. निजामानेंहि बापूंच्या अटके-बद्दल चौकशी केली. "सखारामबापूंनीं अविचारानें कांहीं गंभीर स्वरूपाचा राजकीय गुन्हा केला असल्यानें त्यांना कैदेंत ठेवलें आहे," असें कारभाऱ्यांनीं उत्तर दिलें.

बापूंना सिंहगडावर कैदेंत ठेवलें. कैदेंतहि त्यांची बडदास्त चांगली ठेवलेली होती. दूध पिण्यासाठीं त्यांना खास गाय व म्हैस पाठविल्याचे उल्लेख आहेत. त्यांच्या व्यवस्थेसाठीं दोन नोकर दिलेले होते. नित्याच्या दानास दररोज दहा रुपये, व्यतिपाताच्या दिवशीं सव्वा-दोन तोळे सोन्याच्या अठ्ठावीस पुतळ्या त्यांना मिळत. उत्तम जेवण, भाजी-पाले, फळें, विड्याचीं पानें, सर्वांची सोय केलेली होती. सिंहगडावरून पुढें त्यांना प्रतापगडावर व शेवटीं रायगडावर नेण्यांत आले. रायगडावरच बापू १७८१ च्या ऑगस्ट मध्यें अतिसाराच्या विकारानें वारलें ! त्यांच्या उत्तरक्रियेसाठीं नाना फडणिसांनीं पांच

हजार रुपये खर्च केले. मरणसमयीं बापूंचें वय सुमारें पासष्ट वर्षांचें असावें. बापूंची प्रकृति निकोप होती. त्यांची अंगकाठी सडपातळ होती. बापूंची दिनचर्या सांगणारे कागदपत्र उपलब्ध आहेत. बापू सकाळींच उठत. प्रातर्विधी उरकून शेकत बसत. पुनः चांगले नऊ वाजेपर्यंत झोंपत. मग उठून स्नान, संध्या, पूजा, दुपारचें जेवण उरकून ते सोंगट्या आवडीनें खेळत. दुपारीं ते देवदर्शनास व पुराणास जात. संध्याकाळनंतर ते कारभाराचीं कामें पहात. कारभारांत त्यांचा ढिलेपणा फार असे. राजकीय उलाढालींत देवाण-घेवाण पद्धतीचा कारभार चाले. त्यांचें खाजगी वागणें कर्मठपणाचें नव्हतें. ते शंकराचे भक्त होते. त्यांनीं त्यांच्या हिवरें गांवीं शंकराचें देवालय खूप पैसे खर्च करून बांधलें. सासवडला नदीवर घाट बांधला. त्यांच्याकडे येणाऱ्या विद्वान्, गुणीजनांना ते देणग्या देत.

चांगल्या वस्तूंचा संग्रह करण्याची बापूंना हौस होती. कांचेचे पेले, झुंबरे, गालिचे त्यांच्याकडे असत. बापूंसाठीं उत्तम तांदुळ, उंची कापड व वस्त्रें, केशर, कस्तुरी, नारायण तेल, सुवर्णवर्ख, लांकडी सामान लांबलांबच्या ठिकाणांहून येत असे. त्यावर जकात माफ असे. निजाम, हैदर, नागपूरकर भोसले, कोल्हापूरचे छत्रपती यांच्याकडूनहि बापूंना पोषाख व भेटी येत.

बापूंना चहा पिण्याची चांगलीच संवय असावी असें दिसतें. चहाची संवय त्यांना मॉस्टीन, ॲप्टन् इत्यादि इंग्रज वकिलांच्या सहवासानें लागली असावी. सखारामबापू रायगडावर कैदेंत होते. त्या वेळीं त्यांच्या खोलींत सुमारें चार पौंड चहा, चहादाणी इत्यादि वस्तू होत्या, अशी माहिती जुन्या कागदांतून मिळते.

गृहसुखाच्या बाबतींत मात्र बापू कमनशिबी होते. त्यांनीं पांच लग्नें केलीं. बापूंना आकोपंत नांवाचा एक मुलगा होता. सखारामबापूंच्या उतार वयांत आकोपंत वारले. त्यामुळें सखारामबापूंना फार दुःख झालें. बापूंनीं ते मोठ्या धैर्यानें गिळलें. आकोपंतांच्या मरणसमयीं बारभाईचें कारस्थान ऐन रंगांत आलें होतें. पुत्राच्या मृत्यूचें दुःख गिळून पंतानीं

हातीं घेतलेलें काम नेटानें पुढें चालविलें. एका पत्रांत खालील उल्लेख आहे.

" आकोपंत बाबांचा काल जाहला. मोठा घात झाला. सौ. ताईस मोठे दुःख झालें, तें लिहावयास हात न चाले." आकोपंतांच्या मृत्यूनंतर बापूंनीं मुलांच्या आशेनें आणखी तीन लग्नें केलीं...पण त्यांना मूलबाळ झालें नाहीं. बापूंच्या नवीन लग्नाबद्दल आनंदीबाईनें त्यांना लिहिलें: " नवी भावजय लाडकी केली, तिचें नांव काय ठेवलें? दुसरी कधीं करावयाची?"

बापूंचा स्वभाव परोपकारी व दयाळू होता. तडजोडीनें कार्यभाग साधण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. शत्रूची खुमखुमी जिरविण्याची ते हिंमत धरीत. बोलण्यांत आणि वागण्यांत ते फार सावधगिरी बाळगीत. बापूंच्या शहाणपणाची आणि मुत्सद्देगिरीची वॉरन हेस्टिंग्जनेंहि स्तुति केली आहे.

सखारामबापूंच्या चातुर्याच्या व हजरजबाबीपणाच्या पुष्कळ आख्यायिका आहेत. त्यांतील कांहीं अशा : पेशव्यांच्या वेळीं पुण्यास राजधानीचें महत्त्व प्राप्त झालें होतें. शत्रूपासून शहरास धोका होऊं नये म्हणून सदाशिवरावभाऊंनीं पुणें शहराभोंवतीं कोट बांधण्याची योजना आंखली. योजनेप्रमाणें कोटाचे कांहीं काम सुरू झालें. एकदां फडांतील कचेरींतील काम आटोपल्यावर भाऊसाहेबांनीं बापूंना विचारलें. " बापू कोट पाहिला आहे किंवा नाहीं? काम कसें काय आहे?" बापूंनीं उत्तर दिलें, " कोटाचें काम पाहिलें आहे, पण त्यास अकलेची मजबूती फारच कमी दिसते."

श्रीमंतांनीं भुवया उंचावून विचारले, " तें कसें बुवा?"

बापू म्हणाले, " शत्रू शहराच्या कोटापाशीं दाखल होईल तेव्हांच कोटाचा उपयोग. परंतु जो धनी शत्रू राजधानीच्या कोटापर्यंत चढाई करून येईपर्यंत स्वस्थ राहील, त्यास शहराभोंवतीचा कोट वाचवूं शकणार नाहीं. शत्रू राजधानीपासून लांब आहे तोंवरच त्याच्या हाल-चालींची पक्की बातमी ठेवून, तो दूर अंतरावर असतांनाच त्याला नरम

केलें पाहिजे. राजधानीपासून लांब शत्रूस नरम करण्याची प्रथा ठेवली म्हणजे राजधानी सुरक्षित राहील, कोटाची कांहीं जरूरी नाहीं. ”

“ बापू तुम्ही म्हणतां तें योग्यच आहे ” असें म्हणून भाऊसाहेबांनीं पुण्याभोंवतीं तट बांधण्याचें काम थांबविलें.

फडाच्या कचेरींत होळकरांच्या हिशेबांची पाहणी सुरू होती. माधवराव पेशवे स्वतःच ते हिशेब बारकाईनें पाहत होते. हिशेबांतील कांहीं बाबींबद्दल त्यांना शंका आल्या. त्या त्यांनीं होळकरांच्या कारकुनाला विचारल्या. कारकून जरा शिष्टच होते. पेशवे लहान वयाचे आहेत, हें पाहून स्वतःची मर्यादा सोडून कारकून म्हणाला, “ रावसाहेब, आजपर्यंत आम्हीं आपले हे असेच हिशेब लिहीत आलों. तुम्हीं आतां नवीन मालक आला; त्यामुळें तुम्हांला ते पटत नाहींत. जुने तमाशे आणि नवे डोळे यांचा मेळ कसा बसणार ? ”

कारकूनाचें फाजील बोलणें ऐकून रावसाहेब संतापले. रागानें लालबुंद होऊन त्यांनीं हातांतली चोपडें लांब भिरकावले आणि उठून कारकूनाचा हात धरून, “ जास्त बोलशील तर थोबाड फोडीन, ” असे म्हणून तोंडांत मारण्यास हात उगारला....आतां कांहींतरी विपरीत होणार इतक्यांत बापूंनीं श्रीमंतांचा हात धरला. “ हात कां धरलांत बापू ? ” असें रावसाहेबांनीं विचारतांच बापू म्हणाले, “ हैदर, निजाम व त्यांच्या-सारख्या इतर शत्रूंचा धुव्वा उडविण्यासाठीं जे हात शत्रूवर पडावयाचे तेच हात या क्षुद्र कारकुनावर पडले तर ठीक दिसणार नाहीं. म्हणून हात धरला. या उप्पर आपली मर्जी ! ” बापूंच्या बोलण्यानें माधवरावांचा राग उतरला. कारकून बचावला, मात्र बापूंखेरीज असें धारिष्ट दाखविण्याची इतरांची ताकद नव्हती.

इंग्रजांना हिंदुस्तानांत हात-पाय पसरावयाचें होतें. या कामांत मराठ्यांचा त्यांना मोठा अडथळा होता. मराठ्यांच्या दरबारांतील घडा-मोडी कळण्यासाठीं त्यांच्या दरबारीं आपला एखादा चलाख वकील ठेवावा, अशी इंग्रजांनीं योजना आंखली. पेशव्यांच्याकडे तशी त्यांनीं विनंती केली. वरवर पाहतां ही विनंती योग्य अशीच दिसत होती.

पेशव्यांनीं आपल्या कारभाऱ्यांचीं मतें अजमावलीं. बहुतेकांनीं या नेमणुकीला पाठिंबा दिला. सखारामबापू जुने दोन पिढ्यांचे मुत्सद्दी पेशव्यांनीं त्यांच्या सल्ला विचारला. बापू म्हणाले, " इंग्रजांचा वकील आपल्या दरबारीं येणार असेल तर आपला वकील पण त्यांच्या दरबारीं ठेवावा. म्हणजे बरोबरी होईल. केवळ त्यांच्याच मनुष्याची नेमणूक आपल्या दरबारीं करण्यास परवानगी दिली तर आपल्याकडील बातम्या तो कळवीत राहील. त्यांच्या कडील एकहि खबर आपल्याला मिळावयाची नाहीं. त्यामुळें आपला फार तोटा होईल. त्याकरतां एकतर्फी वकील नेमण्यास परवानगी देऊं नये. "

बापूंच्या सांगण्या प्रमाणें घडले नाहीं. पेशवे दरबारांत राहिलेल्या इंग्रज वकिलांनीं काय काय उद्योग केले, ते आतां उघड झाले आहेत. त्याचा विचार करतां बापूंची दृष्टी किती बारकाव्याची होती, याची कल्पना येते.

अनेक लढायांच्या प्रसंगीं बापूंनीं मुख्य कारभारीपणाची जबाबदारी फारच चांगल्या रीतीनें पार पाडली. सध्यांच्या भाषेंत त्यांना ' चीफ ऑफ दी जनरल स्टाफ ' म्हणतां येईल ! अटकेपासून पाँडेचरीपर्यंत व अहमदाबादेपासून काशी प्रयागपर्यंत मोहिमांत प्रत्यक्ष वावरलेला बापूंच्या खेरीज दुसरा मराठी मुत्सद्दी नाहीं. भाऊबंदकीच्या वादानें मराठी राजवट न किडती तर बापूंची कर्तबगारी इतिहासांत आणखी निराळीच दिसली असती. असें असलें तरी शागिर्दी शिलेदारीपासून मुख्य कारभारी पदापर्यंत स्वतःच्या कर्तबगारीनें चढणाऱ्या बापूंची योग्यता कुणीच नाकारणार नाहीं.

◎ ◎ ◎



देवाजीपंत चोरघडे

बंदुकीचा नेम हुकला. चवताळलेलाभला मोठा वाघ झेपा फेकीत शिकाऱ्यांच्या अंगावर येऊं लागला. चवताळलेल्या क्रूर जनावराचें ओरडणें आणि त्याच्या लांब झेपा पाहून मंडळींच्या अंगाचें पाणी पाणी झालें. अंगें थरारलीं. हातांतील शस्त्रें गळालीं. क्षणभरांत वाघ नरडीचा घोट घेणार आणि शिकाऱ्यांचीच शिकार होणार. इतक्यांत एक पट्टेकरी पठ्ठा त्वेषानें पुढें आला. डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच त्यानें चवताळलेल्या वाघावर पट्ट्याचा वार काढला. झेपावणारें जनावर जमिनीवर कोसळलें. त्याच्या ओरडण्यानें रान दणाणलें. पट्टेकऱ्यानें त्वेषानें कोसळलेल्या वाघावर पांच-सात वार केले. त्या वारांनीं वाघ ठार झाला. काय घडतें आहे, याचा मंडळी विचार करीत आहेत, तोंच पट्टेकरी शिकाऱ्याच्या पुढें आला. जमिनीला हात लावून त्यानें तीन-चार कुर्निसात केले. "शाबास, शाबास, रघूजी, तुम्हीं प्रसंगावधान राखलेंत म्हणूनच आज आम्हीं वाचलों," असें म्हणून त्या शिकाऱ्यानें पट्टेकऱ्याची पाठ थोपटली. स्वतःच्या गळ्यांतला एक मौल्यवान् कंठा त्यांनीं पट्टेकऱ्याच्या गळ्यांत घातला. त्याचा गौरव केला. गौरव करणारे शिकारी होते छत्रपति शाहूमहाराज; व पट्टेकरी होते रघूजी भोसले !

कोयनेच्या खोऱ्यांतील भैरवगडचे रघूजी भोसले त्या वेळीं साधे पथके होते. पण वरील शिकारीच्या प्रसगानें छत्रपतींची त्यांच्यावर मर्जी बसली. महाराजांनीं रघुजीची खूप वाहवा केली. त्यास इनामें दिलीं. स्वतःच्या मेव्हणीशीं त्याचें लग्न लावून देऊन त्यांनीं रघूजीशीं नातेंहि जोडलें. संधि येताच रघूजींना "सेना साहेब सुभा" बनवून वऱ्हाडच्या सुभ्यावर नेमले. रघूजी शूर होते, तसेच ते मुत्सद्दी आणि राज्यकारकारनिपुणहि होते. गोंड राजाला जिंकून त्यांनीं नागपूर घेतलें. तेथें टोलेजंग राजधानी केली. कर्नाटकांत पराक्रम गाजवून त्यांनीं नांव मिळविलें. बंगाल-बिहार-ओरिसा या प्रांतांवर अनेक स्वाऱ्या करून पूर्व हिंदुस्थानांतील मोगल सुभ्यावर वचक बसविला. या कामासाठीं त्यांनीं मोठ्या फौजा उभारून शेंकडों कुटुंबांना कार्यक्षेत्र उपलब्ध करून दिलें.

संधीची संजीवनी मिळतांच सामान्यांतून असामान्य उदयाला येतात. त्यांच्या कर्तृत्वाचा प्रकाश कांहीं काळ डोळे दिपवून टाकतो. स्वराज्याच्या काळांत सामान्यांतून अनेक कर्तृत्ववान् पुरुष उदयाला आले.

रघूजी राजे भोसल्यांचे प्रमुख साहाय्यकर्ते कोन्हेरराम व भास्करराम कोल्हटकर होते. एक होते कारभारी तर दुसरे सेनापती. रघूजी राजे इ. सन १७५५ सालीं वारले. त्यांना चार मुलगे होते. थोरल्या बायकोचे मुधोजी व बिंबाजी असे दोघे व धाकट्या बायकोचे जानोजी व साबाजी असे दोघे. जानोजी जरी धाकट्या बायकोपासून झालेला होता, तरी तो वयानें सर्वांत मोठा होता.

दौलतीचा वारसा ठरविण्यास त्या काळीं मनुस्मृति व याज्ञवल्क्यस्मृती-वरील विज्ञानेश्वरांनीं केलेली मिताक्षरा टीका प्रमाणभूत मानीत. त्यांत सांगितल्याप्रमाणें "पुत्रांच्या अनुक्रमाप्रमाणें त्यांचा वडिलधाकटेपणा खरा. स्त्रियांच्या अनुक्रमावरी पुत्रांचा क्रम नाहीं." ही रूढी त्या काळी प्रचारांत होती. तिला अनुसरूनच रघूजीराजांनीं जानोजीस आपल्या "सेनासाहेब सुभा" पदांचें वारस ठरवून ठेवलें. इतर मुलांनीं सरदारांप्रमाणें राज्याचा उद्योग करावा, असें सर्वांना बजावलें. आपली योजना त्यांनीं पेशव्यांनाहि कळविली.

रघूजी राजे वारल्यानंतर त्यांनीं ठरवून ठेवलेली योजना अंमलांत येती, तर फारच चांगलें झालें असतें. पण तसें घडलें मात्र नाहीं. सरदारांच्या घराण्यांतील नवीन वारसाची नेमणूक म्हणजे पेशवे, कारभारी, सावकार, कारकून यांची पैसे कमविण्याची पर्वणीच! दौलतीचे कांहींहि होवो. दोन्ही बाजूचीं खेकटीं नाचवून मंडळी आप-आपल्या तुंबड्या भरीत; अनेक भानगडी आणि कारस्थानें होत. लढाया चकमकी होत. त्यामुळें घराणींच्या घराणीं खिळखिळी होत. भोसल्यांच्या घरीं तेंच घडलें.

जानोजी कारभार पाहूं लागल्यावर त्याचे बंधू मुधोजी 'सेनासाहेब सुभा' मागूं लागले. तंटा शेवटीं निकालासाठीं पेशव्यांच्याकडे आला. वाटाघाटी

करण्यासाठीं नागपूराहून मंडळी आली. त्यांत बाबूराव कोन्हेर, त्र्यंबकजी-राजे, महिपतराव दिनकर हे होते. या खाशा कारभाऱ्यांबरोबर कांहीं सल्लागार होते. या सल्लागारांत देवाजीपंत चोरघडे होते. त्यांचें सबंध नांव होतें दिवाकर पुरुषोत्तम चोरघडे. देवाजींपंत हे यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण. चिमूर गांवचे रहिवासी. ते कारकुनींत बाके होते. त्र्यंबकजीराजे भोसले आणि भास्करराम कोल्हटकर यांच्या संगतींत राहून त्यांनीं आपली चांगली तयारी केली होती. देवाजीपंत हे जानोजीचे सल्लागार होते.

संधि साधून पेशव्यांनीं सात लाख रुपये नजराणा मागितला. जानोजी भोसल्यांच्या तर्फे देवाजीपंतांनीं पेशव्यांशीं वाटाघाटी करून अडीच लाख रुपये नजराणा ठरला. तो घेऊन पेशव्यांनीं जानोजीस 'सेनासाहेब सुभा' पदाचें वारस म्हणून मान्यता दिली. देवाजी पंताचीहि पत वाढली. भोसल्यांच्या घरांत भाऊबंदकीचीं भांडणें व कटकटी सुरू झाल्या. बाहेरच्या मोहिमा व आणि मुलूखगिऱ्या बंद पडल्या. जानोजी भोसले यांचा भरवसा देवाजीपंतांवर फार होता. त्यामुळें पेशव्यांच्याकडे मुधोजी वारंवार तक्रार करी. "...देवाजी-पंत क्रियानष्ट, दौलत बुडवावयाचे मनसुबे करतात. यांस कैदेंत घालावा." असेंहि मुधोजीनें पेशव्यांना लिहिलें. ह्या सर्व कटकटी १७५९-६० च्या सुमारास चालल्या होत्या. त्या काळांत उत्तरेकडे अब्दालीचा पेंच मोठा होता. तो सोडविण्यास सदाशिवराव भाऊसाहेब उत्तर भारतांत गेले होते. भोसले मात्र घरचीं रकटीं चिवडींत मागें राहिले. पानिपतावर पराभव पदरीं आल्यानें भोसल्यांच्या कटकटी मिटवावयाचें राहून गेले.

पानिपतच्या पराभवाच्या धक्क्यानें बाळाजी बाजीराव पेशवे वारले. त्यांच्यामागून माधवराव पेशवेपदावर आले. तरुण पेशवे माधवराव आणि असंतुष्ट रघुनाथराव यांच्यांत पेशवेपदाबद्दल वितुष्ट आले. त्यांत निजाम, हैदर यांच्यासारखे शत्रू भांडणाला उभे राहिले. मराठीराज्य खिळखिळें होऊन मोडण्याचाच प्रसंग आला होता. पण माधवरावांच्या चातुर्या-मुळें तो टळला.

राक्षसभुवनाच्या लढाईंत माधवरावांनीं निजामाचा पराभव केला. या राक्षसभुवनाच्या लढाईंत साडेतीन शहाण्यांपैकीं एक विठ्ठलसुंदर ठार झाले. या लढाईनें निजामाचें कंबरडेंच मोडलें. मराठ्यांचें राज्य चट्टामट्टा करून टाकण्याचा निजामाचा हेतु धुळीस मिळाला.

नागपूरकर जानोजी भोसले निजामाशीं संगनमत करीत होते. जानोजी भोसल्यांना निजामानें छत्रपतींची गादी मिळवून देण्याचें आमीष दाखविलें होतें. जानोजी भोसल्यांना मराठ्यांच्यामधून फोडून काढून मराठयांचें सामर्थ्य कमी करण्याचा निजामाचा हा एक डाव होता. भल्या बुऱ्या उपायानें सत्ता मिळविण्यासाठीं हापापलेल्या जानोजी भोसल्यांना यांतलें मर्म समजलें नाहीं. त्यांनीं निजामांशीं संगनमत आरंभिलें. परिस्थितींतील धोके लक्षांत घेऊन माधवराव पेशव्यांनीं अत्यंत चतुरपणानें भोसल्यांना ठिकाणावर आणलें. त्यांना त्यांनीं मागितलेली बत्तीस लाखाची नेमणूक माधवराव यांनीं दिली. भोसल्यांनीं सैन्यासह मदतीस यावें, असें ठरलें.

पण ठरल्याप्रमाणें घडलें मात्र नाहीं. राक्षसभुवनच्या लढाईच्या प्रसंगीं पेशव्यांच्या मदतीस जानोजी भोसले आले नाहींत. माधवरावांना ही गोष्ट फार लागली. पण निजामाशीं लढाई सुरू असल्यानें त्यांनीं भोसल्यांबद्दलचा राग दाखवला नाहीं. राक्षसभुवनची लढाई आटोपली. पेशव्यांच्या पदरांत मोठें यश पडलें. निजामाची कटकट बंद झाली. राक्षसभुवनाच्या लढाईनंतर झालेल्या तहाअन्वयें पेशव्यांनीं निजामाला संकटप्रसंगीं मदत करण्याचें कबूल केलें.

जानोजी भोसल्यानें आपणांस फसविलें, ही गोष्ट निजाम व माधवराव ह्या दोघांच्याहि मनास लागली. लढाईनें निजाम कमजोर झाल्याचें पाहून जानोजी भोसल्यानें वऱ्हाड व त्याला लागून असणाऱ्या निजामाच्या प्रदेशांत धुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. निजामानें याचा बंदोबस्त करण्यासाठीं पेशव्यांची मदत मागितली. भोसल्यांना वठणीवर आणण्यासाठीं माधवरावांनाहि कांहीं निमित्त हवे होते. निजामाला मदत करण्याच्या निमित्तानें आलेल्या संधीचा फायदा घेण्याचें त्यांनीं ठरविलें.

फौज जमा करून इ. स. १७६५ मध्यें माधवराव वऱ्हाडच्या रोखानें निघाले. कायगांवटोक्याजवळ निजामाचा दिवाण रुकनुदौला आठ हजार फौजेसुद्धां येऊन माधवरावांना मिळाला. हैद्राबादेहून स्वतः निजामहि निघाले. पण ते येण्याची वाट न पाहतां पेशवे दिवाणासह वऱ्हाडांत घुसले. उत्तर हिंदुस्थानांत स्वारीसाठीं निघालेले दादासाहेब सुद्धां माधवरावांना येऊन मिळाले.

बाका प्रसंग पाहून भोसले गडबडले. त्यांनीं आपले कारभारी देवाजीपंत यांना दादासाहेबांच्याकडे धाडले. दादासाहेब यांचें मन वळवून संकट निवारण्याची महत्त्वाची कामगिरी देवाजीपंतावर होती. देवाजीपंतांच्या कसबावरच जानोजीचा बचाव होणार होता. देवाजीपंत आपल्या कसबांत तरबेज होते. ते दादासाहेबांच्या छावणींत आले.

"देवाजीपंतांनीं येऊन दादांच्या पायीं डोई ठेवली व दादांची मर्जी बहुतप्रकारें प्रसन्न करून घेतली. त्यांना जानोजीची चिठ्ठी दिली. चिठ्ठींत लिहिलें होतें– आपण वडील, आपणांवर राज्यकारभार आहे. आम्ही लेकरें. लेंकरूपणाची आळ चालवावी ..." देवाजीपंतांनीं आपल्या चतुरपणानें दादांची मर्जी प्रसन्न केली. त्यांच्याकडून भोसल्यांना अभयदान मिळविलें. दादासाहेबांच्या ह्या हस्तक्षेपामुळें माधवरावांचा मोठा हिरमोड झाला. डोईजड झालेल्यांना नरम करण्याची चांगली संधि हातची गेली. तहाचीं बोलणीं चाललीं. तेव्हां पूर्वीं जहागिरी म्हणून दिलेला बत्तीस लक्षांचा मुलूख परत घ्यावा, असें रावसाहेबांचें सांगणें होतें. दादासाहेब फक्त पंधरा लक्षांचा प्रांत परत घ्यावा, या मताचे होते. पण माधवराव मुळीं हट्टाला पेटले. त्यांचा करारी स्वभाव दादासाहेबांच्या आतां चांगलाच परिचयाचा झाला होता. दादांनीं आपला हेका चालविला नाहीं. माधवरावांनी चोवीस लक्षाचा मुलूख सरकारमध्यें घेऊन फक्त आठ लक्षांचा प्रांत त्यांच्याकडे ठेवला. निजामाच्या छोट्या मोठ्या-तक्रारी माधवरावांनीं मिटविल्या. जानोजी रघुनाथरावांच्या बरोबर उत्तरेस स्वारीस गेला. रावसाहेब परत आले.

या वेळची रघुनाथरावाची उत्तरेकडील मोहीम फुकट गेली. अपयश पदरीं बांधून ते परत आले. मात्र त्यांनीं माधवरावांना अपयशाचें धनी ठरविण्याचा प्रयत्न केला. पेशव्यांच्या घरांत भांडण कुरबुरीला आरंभ झाला. कारस्थानें सुरू झाली. दादांनीं बडोद्याचे गायकवाड आणि जानोजी भोसले यांना आपल्या मदतीस सैन्यासह बोलविले. जानोजीचे मुख्य सल्लागार दिवाण देवाजीपंत यांनींहि दादांना मदत करावी, असेंच जानोजीस सुचविलें. माधवरावांना याबद्दलच्या सर्व बातम्या लागत होत्या. त्यांनीं चपळाई करून भोसले दादासाहेबांच्या मदतीस येण्याच्या अगोदरच दादासाहेबांचा धोडपच्या लढाईंत इ. स. १७६८ मध्यें पराभव केला. त्यांना कैद करून बंदींत ठेवले. त्यांच्या पाठोपाठ दादांना मदत करणाऱ्यांचाहि माधवरावांनीं बंदोबस्त आरंभला.

माधवरावानें स्वीकारलेलें कडक धोरण पाहून इतरांच्या प्रमाणें भोसले व देवाजीपंतहि काळजींत होते. त्यांना रावसाहेबांचा खलिता आला. हिशोब आणि इतर बाबी यांचा खुलासा करण्यासाठीं माधवराव-साहेबांनीं दिवाण देवाजीपंतांना पुण्यास बोलावलें. तसे देवाजीपंत पुण्यास आले. ते कचेरीत जात. हिशोबाचीं कामें समजावून देत आणि त्याबरोबरच दरबारांतील इतर घडामोडींकडे लक्ष ठेवीत. यावेळीं माधवरावांनीं एक धाडशी बेत आखला होता. हैदर व निजाम यांच्याशीं तडजोड करून इंग्रजांवर मोहीम काढण्याची योजना होती. इकडे इंग्रजावर पेशवे मोहीम करतील, तेव्हां पेशव्यांच्यावर झडप घालावी, असा सल्ला देवाजीपंतांनीं आपल्या मालकास दिला. माधवरावांना हे समजतांच भोसल्यांना बिघडविण्यास देवाजीपंतच कारणीभूत आहेत, अशी त्यांची खात्री झाली. त्यांनीं देवाजीपंतांना कैद केलें आणि भोसल्यांना ताळ्यावर आणण्यासाठीं त्यांनीं गोपाळराव पटवर्धन आणि रामचंद्र गणेश कानडे यांच्यासह मोहीम काढली. त्यांना निजामकडूनहि फौजेची मदत आली. पेशवे भोसल्यांच्या प्रांतांत शिरून त्यांच्या मुलखाची जप्ती करूं लागले. भोसले बंधू आपसांतील भांडणें विसरून एकजुटीनें पेशव्यांशीं लढूं लागले; पण त्यांचे कांहीं चाललें नाहीं. भोसल्यांची ससेहोलपट झाली. इकडे पुण्यासहि कारस्थानें आणि

कट यांना खूप जोर आला होता, तरी पेशव्यांच्या फौजेनें भोसले बंधूंना अगदीं जेर केलें. शेवटीं भोसले शरण आले. तह झाला. त्या तहानें पेशव्यांनीं भोसल्यांना दिलेला मुलूख परत घेतला. शिवाय त्यांच्यावर खंडणी बसविली. इतर दहा अटी ठरल्या. त्या अटींनीं भोसल्यांची सत्ता खूपच मर्यादित झाली. हा तह पेशव्यांनीं देवाजीपंतांच्या मध्यस्तीनें ठरविला. त्यासाठीं त्यांनीं देवाजीपंतांना भोसल्याकडे धाडले.

देवाजीपंतांच्या मदतीनें तह झाला तरी माधवरावांचें त्याच्याबद्दल मत फार वाईट होतें. वरील तह झाल्यावर वाशिम येथें माधवराव आणि जानोजी यांची भेट झाली. त्या भेटींत माधवरावांनीं जानोजीस आपलेसे केले. देवाजीपंतासारख्या उपद्व्यापी माणसाच्या नादी लागल्यामुळें कसें नुकसान होतें, हें त्यांनीं जानोजीच्या लक्षांत आणून दिलें. "हा मनुष्य यापुढें तुमचे आमचे जावसालांत-कारभारांत नसावा. तो नाश करील. त्यास आम्ही आपल्या बरोबर घेऊन त्याचे पारिपत्य करतों," असें माधवराव म्हणाले. पण देवाजीपंतांचे जानोजीवर बरेच उपकार होते. ते मागील उपकार स्मरून त्यांनीं पंतांना आपल्याकडे मागून घेतले. "पंत आमचे ताबेदार आहेत. त्यास आम्हींच शासन करूं. पंतहि आपल्या मर्जीबाहेर वागणार नाहींत." असें आश्वासन जानोजीनें दिलें. पंत माधवरावांच्या कैदेंतून मुक्त झाले. पुढें जानोजीची पंतांच्यावर इतराजी झाली. जानोजीनें देवाजीपंतांना दंड केला. कारभारांतून त्यांना काढून टाकून कैदेंत ठेवले.

देवाजीपंत कैदेंत गेल्यावर भोसले बंधूंचीं भांडणें मिटलीं. माधवराव पेशव्यांचें आणि त्यांचें प्रेमहि वाढलें. हैदरवरील इ. स. १७७० मधील मोहिमेंत भोसल्यांची फौज कर्नाटकच्या मोहिमेंत होती. जानोजीहि पुण्यास येऊन पेशव्यांना भेटले. दोघांच्या सहकार्यानें मराठी राज्याचा बराच उत्कर्ष व्हावयाचा, पण दुर्दैवानें माधवराव आणि जानोजी लवकरच वारले. देवाजीपंत पुढें १७८१ पर्यंत हयात होते. ते नागपूरला वारले. देवाजीपंत हुषार होते. राजकारणी होते साडेतीन शहाण्यांत एक सबंध शहाणा म्हणून त्यांची गणना होते. पण त्यांनीं आपला शहाणपणा राष्ट्रविघातक

उपद्व्याप करण्यांत वायां घालविला; तो ते राष्ट्रहितासाठीं उपयोगांत आणते तर इतिहास कांहीं निराळा घडला असता.

देवाजीपंतांबद्दलच्या कांहीं दंतकथाहि ऐकण्यांत आहेत. माधवरावांनीं दादासाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना शनिवारवाड्यांत नजरकैदेंत ठेवले. त्या वेळीं हैदरवर स्वारीची माधवराव योजना करीत होते. निरनिराळ्या सरदारांना फौजेसुद्धां पुण्यास येण्याची पत्रें गेलीं होतीं. नागपूरचे भोसले फौजेसुद्धां येत आहेत असा निरोप घेऊन देवाजीपंत पुण्यास आले. पेशव्यांची त्यांनीं गांठ घेतली. माधवरावांची परवानगी घेऊन देवाजीपंतांनीं सखारामबापूंची भेट घेतली. भेटीच्या वेळीं माधवरावांच्या कडील कारकून हजर होता. बापू व पंत खेकटीं खेळविण्यांत प्रवीण ! भेट झाली तेव्हां बापू बुद्धिबळें खेळत होते. राजकीय बाबीबद्दल कारकूनाच्या समक्ष बोलणें कठीण होतें. बापूंनीं एक खेळी मोठ्यानें सांगितली. " आमचीं प्यादीं पुढें सरकत आहेत. तर तुमचा राजा तूर्त दोन घरें मागें न्यावा." चतुर देवाजीपंतांनीं बापूंच्याबोलण्याचा अर्थ ध्यानीं घेतला. जानोजी भोसल्यांच्याकडे पत्र पाठवून त्यांना नागपूरला परत जाण्यास सुचविलें.

पुण्यास येत असलेले भोसले नागपूरला परत फिरले. पेशव्यांच्याकडे तसें वर्तमानहि आलें. माधवरावांनीं पंतांना याबद्दल विचारतां पंत म्हणाले, " भोसले आतां येतील." माधवरावांनीं, सखारामबापू आणि देवाजीपंत यांचें बोलणें शब्दनूशब्द हजर असणाऱ्या कारकूनकडून समजावून घेतलें. त्यांतला अर्थ पेशव्यांच्या ध्यानीं आला. त्यांनीं देवाजीपंतांना बोलावून आणले. कचेरींत त्याची मानगूट पकडली. हातांत नंगी तरवार घेऊन.... " तूं हें कृत्य बापूंच्या सांगण्यावरून केलेस किंवा नाहीं?" असें रागानें विचारले, " खोटें बोललास तर मुडदा पाडीन," असेंहि पेशवे म्हणाले. रावसाहेबांचा राग पाहून देवाजीपंतांनीं आपली चूक कबूल केली आणि भोसल्यांना परत पत्र पाठवून पुण्यास बोलावून घेतले. देवाजीपंत मात्र पेशव्यांजवळची आपली पत गमावून बसले.

नारायणरावांच्या खुनानंतर झालेल्या बारभाईच्या कारस्थानांत देवाजीपंतांनीं नाना–बापूंना कांहीं मदत केली. भोसल्यांतर्फे इंग्रजां-बरोबर कारस्थानें करण्याचाहि त्यांनीं प्रयत्न केला. पण नाना फडणीसांनीं मोठ्या चातुर्यानें त्यांचा बंदोबस्त केला असे होते साडेतीन शहाण्यांतील एक शहाणे दिवाकरपंत ऊर्फ देवाजीपंत चोरघडे !

◎ ◎ ◎



विठ्ठल सुंदर

“ आपसांत दुही पडते, तेव्हां शत्रूस बळ फावतें,” असें रघुनाथराव पेशव्यांनीं एका पत्रांत लिहिलें आहे, हें सर्वथा खरें आहे. दुहीचा फायदा केवळ शत्रूच उठवितात, असा भाग नाहीं; स्वार्थी, आपमतलबी शहाणेहि दुहीचा फायदा उठवितात. पेशवे, हैद्राबादचे निजाम व नागपूरकर भोसले यांच्या घरांतील दुहीचा फायदा घेऊन तीन शहाण्यांनीं मोठा हाहाकार उडवून दिला होता. त्यांपैकीं पेशवे सरकारच्या पदरीं होते सखाराम बापू, नागपूरकर भोसल्यांच्याकडे दिवाकर पुरुषोत्तम चोरघडे ऊर्फ दिवाकरपंत; तर हैद्राबादकर निजामाकडे विठ्ठल सुंदर ! विठ्ठल सुंदरांचें पूर्ण नांव विठ्ठल सुंदर परशुरामी. हे देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण होते. ते प्रवरातीरच्या संगमनेरचे राहणारे. विठ्ठल सुंदर रोजगारासाठीं पुण्यास आले. ते नानासाहेब पेशव्यांच्या पदरीं नोकरीस लागले. विठ्ठल सुंदर जात्या हुषार व महत्त्वाकांक्षी होते. ते पेशव्यांच्या निकट परिवारांत काम करावयाचे. एक दिवस नानासाहेब पेशव्यांनीं विठ्ठल सुंदरांना डिवचले. “ माध्यंदिना बुद्धिहिना ” असें ते त्यांना म्हणाले. नानासाहेब पेशवे झाले म्हणून काय झाले. विठ्ठलरावांना त्यांचें हे बोलणें मनोमय लागलें ! आपला व आपल्या बुद्धीचा अपमान झाला, असें त्यांना वाटलें. त्यांना हा अपमान सहन झाला नाहीं. त्यांनी पेशव्यांच्याकडील नोकरी सोडून दिली. पेशव्यांच्या बोलण्याचा सूड घ्यावा, अशी त्यांच्या मनानें उचल घेतली. पुणें सोडून ते गांवीं आले. ऐन पेशवाईंतसुद्धां भागानगरच्या निजामी राज्याची सरहद्द नगर–संगमनेरापर्यंत भिडलेली होती. संगमनेरला तर पुण्याच्या पेशवाईपेक्षां निजामी राज्य जवळचें ! निजामच्या राज्यांत बरेच देशी कामगार होते. त्यांत रामदासपंत हा शिकाकोलचा ब्राह्मण निजामाच्या नोकरीत होता. तो अत्यंत हुशार आणि कारस्थानी होता. फ्रेंच गव्हर्नर डुप्ले व कवायती फौज तयार करणारे बुसी यांजबरोबर रामदास पंतांचीं कारस्थानें चालत. त्यांच्याकडे चांगला पैसा होता. तो स्वतः अत्यंत आंतल्या गांठीचा होता. पेशवे, निजामसरकार, ताराबाई या सर्वांना मधाचें बोट लावून गोड गोड बोलून त्यानें सर्वांनाच झुलविलें. तोच त्यांचा मुख्य कसबाचा व्यवहार होता. संगमनेरचे विठ्ठल सुंदर परशुरामी

या रामदासपंतांच्याकडे नोकरीस राहिले. ते बुद्धिमान् होते, तसेच महत्त्वाकांक्षीहि होते. रामदासपंतांच्या उलाढाली पाहतां पाहतां त्यांच्याप्रमाणेंच खेकटीं नाचविण्यांत पंतहि प्रवीण झाले. ते फारशी आणि अरबी शिकले. मुसा बुसी यांच्या सहवासानें विठ्ठलपंतांनीं युद्धशास्त्रहि आत्मसात् केलें, फर्डेपणानें लेखणी चालविणारे त्यांचे हात तितक्याच शिताफीनें तरवार, तिरकमठा व बंदूक चालवीत. निजामशाहाचा विठ्ठल सुंदरवर विश्वास बसण्यास तसेंच कारण घडलें.

सलाबतजंग हा निजामाच्या गादीवर होता. त्याचा भाऊ निजामअल्ली कांहींहि न करतां नुसता चैनींत कालक्रमणा करी. विठ्ठलपंतांना निजामअल्लीचा आळशीपणा पाहून फार वाईट वाटे. कर्तबगारी करण्यास मोठें क्षेत्र हाताशीं असतांना अल्ली केवळ चैनींत लोळून स्वस्थ पडतो आणि आपणांस मात्र कर्तबगारीला क्षेत्र नाहीं, याचें त्यांच्या मनाला वाईट वाटे. वाईट वाटूनहि कांहीं उपयोग नव्हता. कारण राज्य होतें मोंगलाई! खाविंदाच्या मनांतून कुणी उतरलें तर नोकरींतूनच नव्हे तर जगांतूनहि त्याची हकालपट्टी व्हावयाची! तेथें चार-सहा महिन्यांनीं कुणाचातरी मुडदा पडायचा! कुणीतरी मारेकऱ्यांचा बळी ठरावयाचा किंवा कुणीतरी विषप्रयोगाला बळी व्हावयाचा. हे सर्व पंत डोळ्यांनीं पाहत होते. पण निजामअल्लीचा चंगीभंगीपणा न पाहवून शेवटीं मनाचा हिय्या करून त्यांनीं त्याची सौम्य शब्दांत कानउघाडणी केली. खावंद खुशींत आहेत, हे पाहून पंत म्हणाले, "खावंद, अशा प्रकारचें आयुष्य घालविण्यांत कांहीं अर्थ नाहीं, कांहींतरी कर्तबगारी करून दाखविणें."

पंतांचें ऐकून अल्ली म्हणाले, "मैं क्या करूं?"

"काय करूं काय? खावंद राज्य करा!" पंत म्हणाले!

पंतांचें बोलणें ऐकून अल्ली चमकले. ते खटपटीस लागले. महत्त्वाकांक्षी विठ्ठल सुंदरांनाच त्यांनीं आपले सल्लागार नेमले. अल्लींनीं विश्वास टाकतांच विठ्ठलपंतांनीं अनेक खटपटी व कारस्थानें केलीं. तीं यशस्वी करून त्यांनीं सलाबतजंगाला कैद करविलें. हैद्राबादची गादी निजामअल्लीच्या पदरांत घातली. त्यांच्या या खटपटीचें बक्षीस म्हणूनच कीं काय निजामअल्लीनें विठ्ठलपंतास आपला दिवाण नेमलें!

हैदरजंगाचा खून झाल्यानंतर तो निजामाकडे गेला आहे, अशा भावनेनें निजामाला मारण्यासाठीं फ्रेंच सैनिक धांवले. प्रसंगावधान राखून विठ्ठल सुंदरनें तरवारीनें तंबूची कनात फाडली. त्यामुळें पडलेल्या भगदाडांतून निजामशाहांना बाहेर काढून घोडयावर घालून त्यांना तडक ब्र्हाणपूरला पळविलें. जिवावर संकट आलेलें, पण तें विठ्ठल सुंदर यांच्यामुळें वांचलें, यामुळें निजामांचा विठ्ठल सुंदर यांच्यावर अतिशयच विश्वास बसला.

पेशव्यांचें निजामाशीं पिढीजात वैर! पेशवाईतील घडामोडींवर बारकाईनें लक्ष ठेवून त्यांनीं अनुकूल संधि मिळतांच निजामांचें घोडें पुढें दामटलें.

विठ्ठलपंतांनीं बुसीचा लष्करी चेला इब्राहीमखान गारदी याला निजामाच्या नोकरींत ठेवविलें. पेशव्यांनीं पंचवीस लाखांचा मुलूख मागितला; पण ती मागणी विठ्ठल सुंदरानें निजामास धुडकावून लावावयास लावलें. या सर्व कटकटींमधून सिंदखेडची मोहीम घडली. दि. २० ऑगस्ट १७५७ रोजीं लढाईला तोंड लागलें. निजामाकडे गारदी व त्यांचा तोफखाना होताच. शिवाय, रामचंद्र जाधवराव, नागोजी माने असे कित्येकजण होतेच. पेशव्यांच्या बाजूनें दत्ताजी शिंदे व विश्वासराव यांनीं मोहिमेचें नेतृत्व केलें.

लढाई मोठी अटीतटीची झाली. इब्राहीमखानाच्या तोफांचा गदारोळ उडाला. चार-पांच घटका लढाईची टिपरघाई उडाली. हात धोंड्यांच्या अंतरावर एकमेक उभे राहून लढले. मोंगलांकडील दोनशें घोडीं आणि माणूस ठार झालें. शेवटीं ते तहास आले! नबाबाकडून सलुखाचा पैगाम आला! तहाच्या कारभारांत विठ्ठल सुंदर होतेच! तहाचीं कलमें ठरलीं, पण तीं पाळलीं मात्र गेलीं नाहींत!

सदाशिवरावभाऊ या वेळीं पेशवाईचा कारभार पाहात होते. त्यांनीं इब्राहीमखान गारद्यांस आपल्या पदरीं ठेवलें! त्यांनीं खंडणीचा तगादा केला. यश येत नाहीं, असें पाहून मोहीम काढली. उदगीरजवळ लढाई झाली.

तोफांची रंजक एक उडाली. श्रीमंत भाऊसाहेब, रावसाहेब व दादासाहेब यांनीं हिमतीनें जातीनें घोडे घातले! खाशांच्या हौद्यापर्यंत मारामारी करीत गेले, एक प्रहर–दीड प्रहर युद्ध उत्तम झालें. निजाम कचरला! त्यानें हिंमत सोडली! सल्लख करण्यास वकील पाठविला. भाऊसाहेब यांनीं निरोप पाठविला कीं, “साठ लाख रुपये व दौलताबादचा किल्ला देणें.” भाऊसाहेब यांची मागणी ऐकून रदबदली करण्यासाठीं विठ्ठल सुंदर निजामाची शिक्केकट्यार घेऊन आले! त्यांनीं प्रसंग पाहून भाऊसाहेब यांच्यापाशीं फार रदबदली केली. त्यावरून तह ठरला.

विठ्ठल सुंदराच्या खटपटी-लटपटींवर भाऊसाहेबांचें बारकाईनें लक्ष होतें. निजामाकडच्या कटकटीस विठ्ठल सुंदरच कारणीभूत आहे, हें लक्षांत घेऊन सदाशिवरावभाऊंनीं विठ्ठल सुंदर यांस बडतर्फ करावें, अशी निजामाकडे मागणी केली.

विठ्ठल सुंदरांनीं प्रसंग ओळखला. त्यांनीं पडतें घेतलें. भाऊसाहेबांना त्यांनीं अजीज होऊन कळविलें कीं...“मी सर्व प्रकारें आपले पदरचाच आहे. कृपा करावी. चाकरी करून दाखवीन. निष्ठेनें वर्तणूक करीन...”

निजामांनींहि विठ्ठलपंतांच्यासाठीं सदाशिवरावभाऊंच्याजवळ रदबदली केली. शेवटीं भाऊंना त्यांची भीड ऐकावी लागली. मात्र विठ्ठल सुंदर यास कामावर कायम ठेवण्याबद्दल भाऊसाहेब यांनीं पंधरा लक्ष खंडणी वाढविली. निजामानें ती मान्य केली! कारण त्याला विठ्ठलपंतांचें तसेंच आगळें महत्त्व वाटत होतें.

इसवी सन १७५९–६० मध्यें उत्तरेस अब्दालीचा पेंचप्रसंग उभा राहिला. शिंदे-होळकरांच्या फौजांची दाणा-दाण झाली. त्या पेंचामुळें दक्षिणेकडील राजकारणें गुंडाळून भाऊसाहेब उदगीरहून उत्तरेस गेले! १७६१ मध्यें मराठे पानिपतवर हरले. त्या धक्क्यानें मराठी राज्य मुळासुद्धां हदरलें. पट्टीचे वीर धारातीर्थीं पडले. शूरांची पिढीच्या पिढी गारद झाली. मुत्सद्दी हतबल झाले. दौलत लुटली गेली. या धक्क्यानें खुद्द पेशवेहि वारले!

पेशव्यांच्या घरांत गृहकलह सुरू झाला. पेशवे माधवराव व त्यांचे चुलते रघुनाथराव यांच्यांत भांडणें सुरू झालीं. विठ्ठल सुंदर यांनीं आपल्या कारवाईला ही योग्य अशी संधि हेरली. अनेक राजकारणें त्यांनीं लढविलीं. नागपूरचे जानोजी भोसले, प्रतिनिधि, गोपाळराव पटवर्धन, सदाशिव रामचंद्र इत्यादि पेशव्यांच्या पदरच्या सरदारांना त्यांनीं फितवून आपल्याकडे ओढले. पेशवाईच्या कमकुवतपणाची निजामांना जाणीव देऊन पेशवाईशीं झालेले जुने तह तर धुडकावून लावले, एवढेंच नव्हे तर त्यांनीं पेशवाईतून आलेल्या सरदारांना हाताशीं धरून पेशव्यांच्या मुलुखावरच स्वारी केली. पेशव्यांच्या मुलुखांत लुटालूट झाली. पुण्यावर हल्ला आला. पेशव्यांची कुटुंबीय मंडळी सिंहगडवर आणि लोहगडावर गेली. पुणें लुटलें. विठ्ठल सुंदरनें नाशिक लुटलें. जुन्नर प्रांत लुटला. पुण्याचीहि लूट झाली. तोफखाना लुटून पानश्यांच्या वाड्यास आग लावण्यांत आली. फरासखान्यांतील सर्व सामान लुटून नेण्यांत आलें. शहरांतील देवळांतील मूर्ति छिन्नभिन्न करण्यांत आल्या. कित्येक हवेल्या व पेठा जाळून टाकण्यांत आल्या. वाई, भोर, निरा हेहि भाग लुटले गेले. माधवराव पेशवे यांच्यावर मोठा प्रसंग आला.

त्यांनीं डगमगून न जातां निजामाच्या राज्यांत आपल्या फौजा घुसविल्या. लुटालूट व जाळपोळ यांची पराकाष्ठा केली. क्रोडो रुपये गोळा केले. नासाडीहि खूप केली. पुणें जाळल्याचें ऐकून दादासाहेब पेशवेहि चिडले. त्यांनीं तर भागानगर लुटण्याचा चंग बांधला.

एकंदर रंग पाहून निजाम विठ्ठलसुंदरासुद्धां परत फिरला. माधवरावांनीं त्याच्याकडे गेलेले पटवर्धन, भोसले हे सरदार परत आपल्याकडे घेतले. राक्षसभुवनजवळ त्यांनीं निजामाला गाठलें. त्यांत निजामाचें फार नुकसान झालें. स्वतः निजाम रात्रींच सर्व सामानसुमान, डेरे, राहुट्या, घोडे, सरंजाम सोडून गोदापार करून पलीकडे गेला.

गोदेच्या दक्षिण तीरावर विठ्ठलसुंदर राहिले. त्यांच्याजवळ दहाबारा हजार गारदी होते. शिवाय निंबाळकर, पिंगळे, घाटगे, पवार, घोरपडे असे कित्येक मातबर मराठे सरदार होते. माधवरावांनीं युद्धाची तरतूद

स्वतः केली. घोड्यावर बसून सैनिकांना मार्गदर्शन केलें. विठ्ठल सुंदर अंबारींत बसून लढाई चालवीत होते. त्या वेळीं माहादाजी शितोळे यांस श्रीमंतांनीं आज्ञा केली कीं, विठ्ठल सुंदर यांच्या हत्तीवरील माहूत भाल्यानें मारावा. "या कामगिरीबद्दल दहा हजारांचा गांव व बसता हत्ती मी घेईन," असें तो म्हणतांच श्रीमंतांनीं तें कबूल केलें. महादाजीनें एक धडक मारून भाल्यानें विठ्ठल सुंदरांच्या माहुतास भोसकून खालीं आणलें. श्रीमंतांनीं कबूल केल्याप्रमाणें त्यास इनाम दिलें.

इकडे विठ्ठल सुंदरवरहि कुणीं अज्ञात शिपायानें बंदुकीची गोळी मारली. ती त्याच्या छातींतून आरपार गेली. शरीरांतून प्राण निघून गेला. ते अंबारींतून खालीं पडले. कोसळले! दमाजी गायकवाडाकडील अरबांनीं त्यांचें मुंडकें तोडून भाल्यास टोचून नाचविलें! पंत मेले. - निजाम लढाई हरला! राक्षसभुवनला माधवरावाची कसोटी लागली. तींत ते पूर्ण उतरले.

विठ्ठल सुंदरचा शेवट झाल्यानें स्वार्थी राजकारणें मिटलीं. विठ्ठलपंत हुशार खरे. निजामासारख्यांनीं त्यांच्या बुद्धीचा वापर करून घेतला. त्यांना 'राजाबहादूर प्रतापवंत' असा किताब होता. राजाबहादूर प्रतापवंत विठ्ठल सुंदर आपली शक्ति आणि युक्ति मराठी राज्याच्या भल्यासाठी वेंचते तर इतिहास बराच निराळा झाला असता! पण तसें घडणें नव्हतें इतकेंच!



नाना फडणीस

भले बुद्धीचे सागर नाना,
ऐसे नाहीं कधीं होणार।
खूप शर्तीनें राज्य राखिलें,
मनसुबींची तरवार ॥

इतिहासप्रसिद्ध नाना फडणीस यांचें संपूर्ण नांव बाळाजी जनार्दन भानू असें होतें. त्यांची प्रसिद्धि मात्र संपूर्ण नांवापेक्षां 'नाना' या त्यांच्या घरगुती नांवानेंच जास्त आहे. नानांचे पूर्वज कोंकणांत राहाणारे. रत्नागिरी जिल्ह्यांतील बाणकोट खाडीच्या दक्षिण तीरापाशीं वसलेल्या वेळास या गांवीं भानूंचें घराणें राहात असे. खाडीच्या उत्तर तीरास श्रीवर्धन गांव होतें. तेथें बाळाजी विश्वनाथ भट हे राहात असत. भानू वेळास गांवचे वतनदार होते, तर भट हे श्रीवर्धनचे देशमुख होते. दोन्ही घराणीं खाऊनपिऊन सुखी होतीं. दोन्ही घराण्यांचा एकमेकांशीं खूप लोभ होता.

खाडीच्या तोंडाशीं सुवर्णदुर्ग आणि अंजनवेल हे किल्ले होते. त्या किल्ल्यांवर आणि आजूबाजूच्या प्रदेशावर हबशी लोकांची सत्ता होती. हबशी आणि आंग्रे यांचीं भांडणें होत. त्यांत आंग्रे यांना श्रीवर्धनचे भट सामील आहेत, असें हबशांच्या कानांवर गेलें. त्यांनीं भटांना धरण्यास फौज पाठविली. तिच्यापासून सुटका करून घेण्यासाठीं बाळाजी विश्वनाथ भट यांना पळून जाण्यास निघाले. त्यांच्याबरोबर भानू मंडळीहि निघाली. रस्त्यांत बाळाजी विश्वनाथ भट यांना हबशांनीं पकडलें, पण भानूंनीं पैसे भरून त्यांची सुटका करविली. त्यामुळें भट आणि भानू यांच्यांत मूळचेच असलेले जिव्हाळ्याचे संबंध अधिक जिव्हाळ्याचे झाले. "आम्हांला जी अर्धी भाकरी मिळेल, त्यांतील चतकोर भाकरी तुम्हांला देऊं." असें वचन बाळाजी विश्वनाथानें भानूंना दिलें आणि तें शेवटपर्यंत पाळलें. बाळाजी विश्वनाथ मराठेशाहीचे पेशवे म्हणजे पंतप्रधान झाले. त्यांनीं व त्यांच्या वंशजांनीं भानूंना फडणीस बनवून मोठ्या योग्यतेस चढविलें. राज्याच्या

जमाखर्चाचें महत्त्वाचें काम 'फडणीस पाहात. आजच्या भाषेंत त्यांना 'अर्थमंत्री' म्हणण्यास हरकत नाहीं.

नाना फडणीस यांचा जन्म सातारा येथें दिनांक बारा फेब्रुवारी १७४२ रोजीं झाला. त्यांच्या आईचें नांव रखमाबाई. रखमाबाई या पेशवाईंतील शूर सरदार बळवंतराव मेहेंदळे यांच्या भगिनी होत्या. नानांचें शिक्षण पेशव्यांच्या मुलांबरोबरच झालें. विश्वासराव, माधवराव हे बाळाजी बाजीरावाचे मुलगे आणि नाना हीं सर्व समवयस्क मुलें सदाशिवरावभाऊ यांच्या देखरेखीखालीं शिकत. त्या वेळचें शिक्षण फारसें गुंतागुंतीचें नव्हतें. उत्तम वळणदार अक्षर झरझर लिहिणें आणि जमाखर्च आणि हिशोब करतां येणें यांवर मुख्य भर असे. संध्या, रुद्र, पवमान यांचें पाठांतर करून घेण्यांत येई. रामायण, महाभारत आणि जुना इतिहास थोडक्यांत सांगितला जाई. या सर्व गोष्टींबरोबरच लष्करी शिक्षणहि मिळे. 'घोडयावर बसणें व लिहिणें–पढणें चांगलें करणें' पडे! घोडयावर बसणें, तरवार, भाला, बंदुक, बोथाटी, इत्यादि वापरणें शिकावें लागे. सूर्यनमस्कार, जोर, बैठक, कुस्ती यांचा व्यायाम सक्तीनें करून घेतला जाई.

नाना बुद्धिवान होते. त्यामुळें त्यांनीं लिहिणें, वाचणें, हिशोब, जमाखर्च यांत चांगलें प्रावीण्य मिळविलें. पण प्रकृतीच्या अशक्तपणामुळें त्यांनीं शरीर कमावण्याचा आणि युद्धोपयोगी शस्त्रकला शिकण्याचा आळस केला. त्यामुळें त्यांची शारीरिक शिक्षणांत मुळींच प्रगति झाली नाहीं. या दुबळेपणामुळें नानांना नेहमीं दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागे. सदाशिवरावभाऊ यांच्या संगतींत राहून दरबारी कामांतील उरक, तडफ, रेखीव वर्तन आणि वचक इत्यादि गुण नानांच्या अंगीं उतरले. नानांच्या गुणांचा प्रभाव त्यांच्या कारभारावर ठिकठिकाणीं दिसतो.

नाना फडणीस यांचे वडील वारल्यानंतर सन १७५६ मध्यें नानांना फडणिशी मिळाली. यावेळीं नाना फडणिसांचें वय होतें फक्त चौदा वर्षांचें! या छोट्या फडणिसांकडे राज्याचे हिशोब सांभाळण्याची जबाबदारी पडली. फडणिशी मिळाल्यावर नाना सदाशिवरावभाऊंच्या बरोबर कर्नाटकांत स्वारीवर गेले. तेथून पुढें इ. स. १७६० च्या सुमारास

अहमदशहा अबदालीचा पेंचप्रसंग आला. तो सोडविण्यास सदाशिवराव-भाऊ उत्तरेस दिल्लीच्या मोहिमेवर गेले. नानाहि त्यांच्याबरोबर गेले. त्यांच्या पत्नी आणि मातोश्री याहि स्वारीबरोबर होत्या.

सन १७६१ मध्यें पानपतावर मराठ्यांचा मोड झाला, फौज उधळली; सैनिकांची कत्तल झाली. लढाईचा डाव उधळतांच माणसें जीव वांचविण्यासाठीं रणांगणांतून पळत सुटलीं. त्यांत नानाहि होते. पानिपतच्या रणांगणावरून परत येतांना कसे हाल झाले, याचें वर्णन खुद्द नानांनीं लिहून ठेविलें आहे. नाना लिहितात :

“ श्रीमंत दिसेनासे झाले. तेव्हां ईश्वरें बुद्धि दिली. माघारे फिरलों! सायंकाळचे दोन घटका दिवसास पाणिपतांत आलों. त्या देशीचा मार्ग ठाऊक नाहीं. तेथें रामजीपंतांनीं रस्ता दाखविला. त्यांच्या सांगण्या-वरून घोडें व वस्त्रें टाकून दिलीं. शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र झाल्यावर चालूं लागलों तों एक कोस अंतरांत तीन चार वेळ शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला. गिलचे दर वेळेस समागमीचे दहावीस लोक तोडून टाकीत. त्यांत मी राहिलों, ही सत्ता ईश्वराची!”

या प्रवासांत नानांचे फार हाल झाले. त्यांचें शरीर अशक्त, त्यांत परिश्रम अतिशय झाल्यानें त्यांना आमांशाचा आजार झाला. जवळ खाण्यापिण्यासाठीं कांहीं नव्हतें. नाना आपल्या आत्मचरित्रांत लिहितात, “ शरीर अशक्त. ऊन्ह कसें तें पाहिलेंच नाहीं ! आणि पायीं चाल-ण्याचा अभ्यास नसतां सोळा सतरा कोस अन्नपाण्याशिवाय उपाशी पोटीं आलों. तिसरे प्रहरीं भूक लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला, तो खाल्ला, पण तो गिळेना ! तेव्हां तसाच संध्याकाळीं गांवाबाहेर आलों. एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकरी करून खाल्ली. ती अमृतासमान लागली. ”

अशा हालअपेष्टा काढीत, प्रवास करीत असतां शत्रूच्या फौजा पाठलाग करीत येत. तेव्हां नाना रस्त्याच्या कडेला उगवलेल्या गवतांत जाऊन लपत. “ ईश्वरें तृणेंकरून रक्षिलें ! ” पण दर वेळीं मात्र ही युक्ति सफळ झाली नाहीं ! एकदां नानांना गवतांत लपतांना स्वारांनीं

पाहिलें. नानांना त्यांनीं गवतांतून ओढून बाहेर काढलें. नानांच्या डोळ्यांपुढें संकट स्पष्ट दिसूं लागलें. मृत्यूच्या भयानें त्यांचे हातपाय लटपटूं लागले. अशक्त, लंगोटी नेसलेले, कांपरें भरलेले, बैरागी वेषांतील नाना पाहून एका म्हाताऱ्या शिपायाच्या मनांत त्यांच्याविषयीं दया उत्पन्न झाली. तो इतरांना म्हणाला, “ याला कशाला मारतां ? ” मग नानांची त्या प्राणसंकटांतून सुटका झाली. अशा अनंत अपेष्टा सहन करीत ते दाक्षिणेंत परत आले. त्यांची पत्नी आणि आई या मात्र पानिपतच्या पळांत बेपत्ता झाल्या. नानांनीं पुढें त्यांचा पुष्कळ शोध केला; पण त्या शेवटपर्यंत सांपडल्या नाहींत. त्यांचा शोध करण्यासाठीं नानांनीं अनेकांना पत्रें लिहिलीं. त्यांत एक महत्त्वाची बाब असे. नाना लिहीत, “ आई आणि बायको यांचा शोध लागला आणि त्या शुद्ध असल्या तरच त्यांना परत पाठविणें. नाहीं तर त्यांना परस्पर गंगेंत देहत्याग करण्यासाठीं प्रयागला पाठविणें. ” सख्ख्या आईबद्दलची आणि पत्नीबद्दलची त्यांची ही विचारसरणी विचित्र वाटते !

या पानिपत प्रसंगानें नानांना अनुभव मात्र पुष्कळच मिळाला.

थोरल्या माधवरावांच्या कारकीर्दींत नानांचा कारभारांत चांगलाच प्रवेश झाला. माधवराव यांनीं रघुनाथराव यांचा बंदोबस्त केला. जुने पाताळयंत्री कारभारी दूर केले. नऊ वर्षांच्या कारकीर्दींत त्यांनीं हैदर आणि निजाम यांच्यावर अनेक मोहिमा केल्या आणि त्या यशस्वी झाल्या. त्या सर्व मसलती यशस्वी होण्यांत नानांचा वांटा मोठा होता. राज्यांतील मुलखांतून दक्षपणानें वसूल गोळा करून लक्षावधि रुपये ते श्रीमंतांकडे मोहिमेवर पाठवीत. दारूगोळा, सामानसुमान यांचा रणांगणावर व्यवस्थित पुरवठा करीत. आणि मागें पेशवाई मुलखांत बंदोबस्त चांगला ठेवीत. माधवराव पेशवे स्वारीवर बाहेर असल्यानें त्यांच्या पत्नी रमाबाई यांना विड्याच्या पानांची आवश्यकता नाहीं, असें म्हणून नानांनीं तीं बंद केलीं. माधवराव पेशवे एवढे कडक, पण त्यांनीं नानांच्या या कृत्यास संमति दिली.

माधवराव पेशवे क्षयानें फार लौकर वारले. त्यांचे धाकटे भाऊ नारायणराव पेशवे झाले. ते फार अल्लड आणि पोरकट होते. पर्वतीवर

बोथाटी फिरवितांना त्यांनीं गंमतीनें नानांचें पागोटें उडविलें ! भोंवतालीं हंशा पिकला, पण नाना प्रसंगावधान राखून म्हणाले, " आम्हां नोकरांचें पागोटें उडालें तर हरकत नाहीं; श्रीमंतांनीं आपलें पागोटें मात्र सांभाळावें ! "

नारायणराव पेशवे आणि त्यांचे चुलते रघुनाथराव दादासाहेब यांच्यांत बेबनाव झाला. नाना फडणीस यांचें न ऐकतां नारायणरावांनीं चुलत्यास नजरकैदेंत ठेविलें. पुढें अनेक कारस्थानें होऊन शेवटीं शनवारवाड्यांत नारायणरावांचा खून झाला. सारें पुणें हादरलें ! मुत्सद्दी कावरेबावरे झाले ! सरदार आश्चर्यमूढ झाले ! अशा बिकटप्रसंगीं नाना फडणीस यांनीं साऱ्यांना एकत्र आणून बारभाईंची एकजूट केली आणि राज्यकारभारांत होणारा गोंधळ वांचविला.

बारभाईंनीं नारायणरावांच्या गरोदर पत्नीस पुरंदर किल्ल्यावर जपणुकीनें ठेविलें. त्यांना मुलगा होतांच त्याचें नांव सवाई माधवराव असें ठेवून कारभार चालविला. बारभाईमध्यें सखारामबापू बोकील, मोरोबादादा, शिंदे, होळकर अशीं भिन्नभिन्न मतांचीं माणसें होतीं. प्रसंगीं लहानपणा पदरांत घेऊनहि नानांनीं सर्वांचीं एकजूट कायम राखली. शेवटीं राघोबादादा इंग्रजांकडे आश्रयाला गेले आणि त्यांची मदत घेऊन पुण्यावर चालून आले. पण प्रत्यक्ष लढाईंत इंग्रजांना चांगलीच ठोकर बसली. तेव्हां इंग्रजांनीं बारभाईंशीं पुरंदरचा तह केला.

नानांनीं सवाई माधवरावांचें पालनपोषण आणि शिक्षण चांगल्या प्रकारें केलें. खास शिक्षक नेमून शिक्षणाची व्यवस्था केली. ' नारायण व्यवहारशिक्षा ' हा ग्रंथ आणि ' पेशवाईची बखर ' हीं पुस्तकें नानांनीं मुद्दाम तयार करून घेतली.

मध्यंतरीं बारभाईंतले मोरोबादादा फडणीस यांनीं नानांना काढून लावण्यासाठीं कारस्थान केलें. निरनिराळ्या परदेशीं दरबारांशीं फितुरी केली, पण नानांनीं त्यांचें कारस्थान मोडून काढलें.

पानिपतावर बेपत्ता झालेल्या सदाशिवरावभाऊंचा एक तोतया निर्माण झाला. त्यानें कोंकणांत अनेकांना वश करून घेऊन मोठी

धामधूम माजविली. पार्वतीबाई यांनाहि तोतया खराच सदाशिवभाऊ असावा, असें वाटूं लागलें. नानांनीं न डगमगतां तोतयाला पकडलें. जाणत्या लोकांकडून खात्री करून घेऊन त्याचा जबाब घेतला. 'आपण खरे सदाशिवरावभाऊ नाहीं,' हें त्यानें कबूल केलें. मग नानांनीं तोतयाला 'डोक्यांत मेखसूं' मारून ठार करण्याची शिक्षा दिली. त्याला सामील होऊन दंगल माजविणाऱ्यांनाहि कडक शासन केलें. हें सर्व तोतयाचें प्रकरण पार पडतांना नानांची कसोटीच पणाला लागली.

पुढें पुरंदरचा तह अमान्य करून इंग्रजांनीं नव्या दमाच्या फौजा पुण्याकडे पाठविल्या. कवायती पलटणींच्या जोरावर हां हां म्हणतां पुणें घेऊं, असें त्यांना वाटत होतें. पण नानांनीं मराठ्यांची फौज पाठवून बोरघाटांतून येणाऱ्या इंग्रज पलटणींचा वडगांवच्या लढाईंत पराभव केला. "इंग्रजांचा मोड झाला. पांच-चारशें माणूस मारले ! पांच तोफा व दोन गरनाळा पाडाव करून आणल्या. दोन हजार बंदुकी व लूट मिळाली !" वडगांवला तह झाला. इंग्रजांनी राघोबाला मराठ्यांच्या स्वाधीन केलें. महादजी शिंदे यांच्या मदतीनें नानांनीं राज्यांत फंद-फितुरी करणाराचा बंदोबस्त केला.

नानांच्या शरीराचा बांधा उभट होता. ते सडपातळ होते. त्यांची मान उंच होती. त्यांचा वर्ण सांवळा होता. त्यांचा चेहरा उग्रगंभीर दिसे ! त्यांचे डोळे तीक्ष्ण आणि पाणीदार होते. ते बोलणाराकडे गंभीरपणें पाहात आणि मोजकें बोलत. त्यामुळें त्यांच्याबद्दल भीति वाटत असे ! नाना शरीरानें अशक्त होते, तरी त्यांचें खाणें-पिणें नियमित आणि पद्धतशीर असे ! त्यामुळें त्यांचें आरोग्य चांगलें होतें. लहान वयापासून नानांवर अनेक खेदजनक प्रसंग आले होते. त्यांना मुलें-बाळेंहि नव्हतीं. त्यामुळें ते नेहमीं खिन्न असत. ते सहजासहजीं हंसत नसत. त्यांची वृत्ति गंभीर असून बोलण्याची ढब और होती. बोलण्यांत ते सुभाषितें वापरीत किंवा चपखल दृष्टांत देत, त्यामुळें बोलबोल म्हणतां, समोरच्या माणसावर ते आपली छाप बसवीत ! ते हजरजबाबी होते. नानांना जेवण्यांत तिखट पदार्थ चालत नसत. उत्तरेंतून किंवा

इतर लांबलांबच्या ठिकाणांहून द्राक्षें, डाळिंबें, मोसंबीं इत्यादींच्या टोपल्या आणि भाजीपाला, कोथिंबीर यांचे करंडे त्यांच्यासाठीं आणविण्यांत येत.

नानांना अनेक चिजा मागविण्याचा नाद होता. सोन्याचीं तबकें, पानदानें, गुलाबपाणी, अत्तरदाण्या, मिनाचें काम केलेल्या कलात्मक वस्तू, चांगले तंबोरे, तसबिरी, चित्रें इत्यादि अनेक कलाकुसरीच्या जिनसा त्यांनीं ठिकठिकाणांहून मिळवून त्यांचा संग्रह केला. नाना फडणविसांनीं अनेक इमारती, घाट आणि देवालयें बांधलीं. पुण्याची बेलबाग म्हणजे विष्णुमंदिर, नानावाडा, नानाचा हौद त्यांनीं बांधला पुण्याची गणेश पेठ नानांनीं वसविली, कोंकणांत वेळास या गांवीं कालभैरवाचें देवालय बांधलें. खोपवलीस तलाव, देवालय आणि धर्मशाळा बांधल्या. भीमाशंकराचें देऊळ बांधण्यास त्यांनीं सुरुवात केली. नानांचा मेणवली येथील वाडा व त्यांनीं बांधलेला घाट अद्यापहि चांगल्या स्थितींत आहे. अशा प्रकारच्या निरनिराळ्या लोकोपयोगी कामांत नाना फडणिसांचे सुमारें एक कोटी रुपये खर्च झाले असावेत, असा इतिहासकारांचा अंदाज आहे. काशीक्षेत्राची यात्रा करावी, अशी नानांची तीव्र इच्छा असे. पण त्यांच्यामागील उद्योगानें यात्रेसाठीं त्यांना उसंत मिळाली नाहीं. काशी येथें आपल्या हातून कांहीं पुण्यकृत्य घडावें म्हणून नानांनीं तेथील कर्मनाशी नदीवर पूल बांधण्याचें काम सुरू केलें. पुलाचा पाया टिकेना, तेव्हां तेथील ब्राह्मणांनीं अनुष्ठानास आरंभ केला. नानांना ही गोष्ट समजल्यावर त्यांनीं अनुष्ठान बंद करविलें; आणि इंग्रजांच्या मार्फत बेकर नांवाचा इंग्रज इंजिनीयर आणवून, त्याच्याकडून यांत्रिक मदतीनें पुलाचा पक्का पाया घालण्याचें काम पूर्ण केलें. ही गोष्ट १७९५ सालांतील आहे!

नाना फडणिसांची दिनचर्या पुढीलप्रमाणें असें : ते अरुणोदयाच्या वेळीं उठत, मुखमार्जन वगैरे आटोपल्यावर ते थोडा वेळ देवाचें नामस्मरण करीत आणि कांहीं जरूरीचीं कामें करीत. नंतर स्नानसंध्या आणि पूजा यांत त्यांचे दोन तास जात. मग ते पालखींत बसून बेलबागेंत जात. तेथें देवाची पूजा करून 'विष्णुसहस्रनामा'चा पाठ

म्हणत. दुपारीं बारा वाजतां भोजन आणि घटकाभर विश्रांति; विश्रांति संपतांच ते कारभारास बसत. ते सायंकाळपर्यंत हालत नसत. नंतर ते बाहेर देवदर्शनास जाऊन येत असत. सायंसंध्या आणि फराळ यानंतर ते विश्वासांतील माणसांची चर्चा, गुप्त हेरांशीं मसलत, महत्त्वाचा पत्रव्यवहार हीं कामें मध्यरात्रीपर्यंत चालत, या कामानंतर ते सुमारे चार तास झोप घेत.

नाना फडणीसांचें हेरखातें मोठें दक्ष असे. जेथें संशय दिसेल, पाणी मुरतें आहे असें दिसेल, तेथें गुप्त बातम्या काढण्यासाठीं नाना आपले हेर नेमीत. हे हेरहि अशा रूपानें जात कीं त्यांचा कधीं कुणाला सहसा संशय यायचा नाहीं ! हीं हेर माणसें अगदीं हलकीं काम करायची ! कुणी हुजऱ्या तर कोणी मशालजी ! कुणी आचारी पाणके तर कुणी शास्त्री पंडित ! एका ठिकाणीं एकच नाहीं, तर तीन तीन, चार चार माणसें ! पण त्यांना एकमेकांच्या कामाचा पत्ता नसायचा ! या माणसांकडून नानांच्या हातीं गुप्त बातम्या आल्या कीं नाना लगेच बंदोबस्ताच्या कामाला लागत !

नानांच्या काळांत इंग्रज वकील मॅलेट पुण्याला संगमाजवळ राहात. मोठ्या खुबीदारपणाने त्यांचा कारभार चाले. स्वतःच्या संरक्षणासाठीं मुंबईहून जंबुरे म्हणजे लहान तोफा आणायचे त्यांनीं ठरविलें. पण त्यासाठीं सरळ परवानगी मागावी, तर नानांकडून ती मिळायची नाहीं ! मग त्यांनीं आपले खाण्यापिण्याचे पदार्थ रोज मुंबईहून आणण्याची परवानगी पेशवे दरबारकडे मागितली.

"रोज तीन मेणे तुमच्या खाद्यपेय पदार्थांचे मुंबईहून यावेत. त्यास सरकारकडून मनाई होणार नाहीं; पण यांत एखादी गैरवाजवी गोष्ट झाल्यास त्याबद्दल कडक विचार केला जाईल !" अशी नाना फडणीसांनीं परवानगी दिली.

मॅलेटला ही गोष्ट सोयीची वाटली आणि त्याप्रमाणें मुंबईहून बोरघाटांतून रोज तीन मेणे पुण्यास येऊं लागले. रोज बिनबोभाट मेणे येतात, असा अनुभव आल्यावर एक दिवस या मेण्यांतून लहान जंबरे

म्हणजे छोट्या तोफा पुण्यास आणण्याचा घाट मॅलेटनें घातला. ते घेऊन सामानाचे मेणे मुंबईहून निघाले. खंडाळ्याच्या घाटानें ते पुण्यास येऊं लागले. नानांच्या हेरांकडून ही बातमी त्यांना समजली. त्याच्या आधारानें नानांनीं हुकूम सोडले ! त्यादिवशीं खाद्यपेय पदार्थांचे मेणे पुण्यास येऊं दिले. ज्यांत जंबुरे होते, तो तिसरा मेणा खोपवलीच्या जकात चौकीवर अडवून ठेवला !

इंग्रजांच्या वकीलाला हें समजतांच त्यानें पेशव्यांच्या दरबारांत येऊन अकांडतांडव केलें. प्रथम परवानगी देऊन मागाहून मेणा अडविल्यानें आपला मोठा अपमान झाल्याचा कांगावा त्यानें केला. पण नानांनीं मेण्यांतील सामानाची यादी मागतांच इंग्रज वकीलाची स्वारी गडबडली. मनांत काय तें उमगली. झाली एवढी फजीती पुरे झाली असें पाहून त्यानें तो अडविलेला मेणा मुंबईला परत नेण्याची परवानगी मागितली. नानांनीं ती दिली. पाताळयंत्री इंग्रज मात्र मनांत समजलें कीं नाना आहेत, तोंपर्यंत आपलें कांहीं चालायचें नाहीं.

निजामअल्लीकडल्या तर जनानखान्यांतल्याहि बातम्या नानांना समजत ! राघोबादादांची पत्नी आनंदीबाई एवढ्या आंतल्या गांठीची आणि पक्की; पण तिची कोपरगांवची सबंध दिनचर्या नानांना कळे ! त्यांनीं तशी खास व्यवस्थांच केली होती. आनंदीबाई कधीं म्हणे, "कारभाऱ्यांनीं आम्हांला निर्माल्यवत् केलें ! जेथें मोती वेंचले, तेथें गोवऱ्या वेंचण्याची पाळी आली." भटाभिक्षुकांना दानधर्म करण्याची वेळ आली म्हणजे ती म्हणे, "दानधर्म खूप करावा, असं वाटतं ! पण आतां आमच्या हातांत कांऽहीं नाहीं !" आनंदीबाईला खर्चायला हजारो रुपयांची तरतूद करूनसुद्धां तिच्या कपड्यांच्या, दागिन्यांच्या एवढेंच काय टेंभ्यांच्या पलित्याला लागणाऱ्या कापडाच्याहि मागण्या असत ! बाईची कितीतरी गुप्त राजकारणेंहि असत; पण त्या सर्व बारीकसारीक वार्ताहि नानांना आपल्या हेरांमार्फत नित्य कळत असल्यानें तिचीं सर्व कारस्थानें नाना फडणीसांनीं मुळांतूनच उपटून टाकली. या आनंदीबाईवर आणि तिच्या कारस्थानांवर जर नानांनीं

बारिक लक्ष ठेवलें नसतें, तर तिच्या नवऱ्याप्रमाणें—राघोबाप्रमाणेंच तिनेंहि पेशवाई गोत्यांत आणली असती !

नाना फडणिसांच्या चातुर्याच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. दोन अगदीं हुबेहुब दिसणारे घोडे घेऊन एक सौदागर आला, आणि यांपैकीं आई कोणती व मुलगी कोणती असें विचारूं लागला. नानांनीं त्या घोड्यांना खोल पाण्यांत पोहायला लावून पुढें आली ती आई व मागें राहिली ती मुलगी हें ओळखलें.

एक बहुभाषाभाषी मनुष्य पुणें दरबारांत आला व आपली मातृभाषा कोणती ती ओळखा, असें विचारूं लागला. नानांनीं तो गाढ झोपेंत असतां त्यावर पाणी ओतून, अशा वेळीं त्याच्या तोंडून नकळत बाहेर पडणारी गुजराथी ही त्याची मातृभाषा हें ओळखलें !

अशा नानांच्या चातुर्याच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. असो. नाना फडणिसांचा मराठी राज्यास फार उपयोग झाला. त्यांनीं सवाई माधवराव पेशव्यास लहानाचें मोठें केलें. बारभाई कारस्थान यशस्वी करून दाखविलें. इंग्रजांशीं सामना दिला आणि मराठ्यांच्या दौलतीचें कल्याण केलें. शाहू छत्रपति किंवा थोरले बाजीरावसाहेब यांच्यासारखा धनी त्यांना लाभला असता तर मराठ्यांच्या राज्यांतील अंतर्गत सुधारणा करण्यांत त्यांचें कौशल्य अधिक दिसून आलें असतें.

सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर माजलेल्या अराजकांत नानांचे फार हाल झाले आणि त्यांना बंदिवासहि भोगावा लागला. अखेर दिनांक १३ मार्च सन १८०० रोजीं हा थोर मुत्सद्दी मरण पावला. नानांसंबंधीं क्वचित् कोठें विरोधी उद्गार ऐकूं येत असले, तरी ‘ जब तक नाना, तब तक पूना ’ हे हिंदी भाषेंतील शाहिराचे शब्द सार्थ आहेत. इंग्रज लेखक कर्नल पामर म्हणतो, “ नानाबरोबर मराठेशाहींतील शहाणपण लयाला गेलें ! ”

० ० ०

ऐतिहासिक पत्रांतील कांहीं मनोरंजक माहिती.

: १ :

पानिपतच्या १७६१ मधील युद्धापूर्वी मराठ्यांनीं अटकेपर्यंत मुलूख पादाक्रांत केला होता. त्या मोहिमेंत सखारामबापू मुख्य कारभारी होते. त्यांच्याच शब्दांत मोहिमेचा तपशील असा होता. ते लिहितात :

" सेवेसी विज्ञापना. आम्ही अंतरवेद प्रांतें आलों. मुलुखाची जप्ती केली... नर्जीब काढून दिल्हा. अबदालीचा बंदोबस्त दूर करून श्रीमंताच्या हातचा जाला. पुढील तह निम्मे उप्तन्नाचा करार ठरला. बावीस सुभ्याचा तपशील असा— साहा सुभे दक्षिणचे. तसेच माळवा, गुजरात, आग्रा, आजमीर हे आपणांकडे आलेच आहेत. लाहोर प्रांतीं अंटकेपावेते सहा सुभे अबदलीकडे आहेत बाकी पाचसा राहिले. अंतरवेद आपणाकडे पहिली आहेच. आयोध्या बंगाला, दिल्ली, पटणे हे राहिले, ते दोन चार दिवसांत वाटून घेतील... मेहनत केली तर लाहोर वगैरे सुभे हेहि सुभे सुटावया जोगे आहेत. स्वामीचे पुण्य थोर आहे. काले करून सर्व होऊन येईल. आमचे पदरी लेकूरपण आहे. वारंवार शिक्षायुक्त लेखन केलिया उत्तम आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापणा"— (पत्राचें लेखन सखारामबापूंचें पण पत्र रघुनाथरावाचें नानासाहेबांस)

पे. द. २।८४
ता० २४-११ १७५७.

: २ :

नाना फडणीस पानिपतच्या मोहिमेंत होते. लढण्याच्या किंवा कारभाराच्या कामांत त्यांनीं प्रत्यक्ष भाग घेतला नाहीं. तरी मोहिमेंत घडणाऱ्या प्रसंगाचे तसेंच तत्कालीन परिस्थितीचें त्यांनीं आपल्या पत्रांतून यथातथ्य वर्णन केलें आहे. त्या मजकुरांतून पानिपत मोहिमेचें सत्य वर्णन उपलब्ध होतें.

(१) ता. १५-९-१७६० रोजीं दिल्लीहून आपले चुलते बाबूराव फडणीस यांना नाना फडणीस लिहितातः

" तीर्थरूप राजश्री बाबा वडिलांचे सेवेसी आपत्यें बाळाचे साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान...मुक्काम इंद्रप्रस्थ येथें येथास्थीत असे. इकडील वर्तमान तर दिल्लीचा किल्ला श्रीमंतांनी घेतला...त्यावर अबदाली अनुपशहराकडे होता, तो दिल्लीजवळ (नदी) पलिकडे येऊन राहिला. यमुनेस पाणी फार, उपाय नाहीं. नावा सर्व होत्या, त्या आपले हातीं लागल्या. शत्रूची सर्व फौज दिसते. सुज्यातदौला नजीबखान सर्व रोहिले मिळाले आहेत. सल्लयाचा मजकूर सुजाउद्दौला बोलतो तो लबाड आहे. परिणाम नाहीं. आपली फौज भारीच आहे. परंतु पोटास नाहीं. घोडी दाणा खावयास विसरली. माणसास अन्न मिळतां कठीण दिवस इतकेंच मात्र संकट आहे. महालाकडून ऐवज येईल तेव्हां फौजेस पोटास मिळेल. कर्ज तो कोठे मिळत नाहीं. महिन्याभरांत पाणी उतरेल. लढाई मातबर व्हावी असा विचार दिसतो. त्याजमध्यें दम दिसतो. आपली फौज एकदिल आहे. सर्व अरिष्टें वारतील. पारपत्य लौकरच होईल. पुढील मनसबा लिहून पाठवूं. बहुतकाय लिहूं ? कृपा करावी हे विनंती...

पे. दप्तर २।१३१, पानिपतची मोहीम

: ३ :

नानांनी आपलें आत्म चरित्र लिहिलें आहे. मनमोकळेपणानें त्यांनीं स्वतःबद्दल व मोहिमेबद्दल लिहिलें आहे. युद्धार्थ जातांना रस्त्यांत केलेल्या मथुरेच्या यात्रेबद्दल वर्णन करतांना नाना फडणीस लिहितातः—" श्रीमथुराक्षेत्रीं गेलों. तेथें क्षौर प्रायश्चित्त श्राद्धादिक करून नंतर भगवान् पूर्णब्रह्म राधाकृष्ण यानें सकल लीला केल्या असे जें वृंदावन त्या स्थळास गेलो. तेथें कालियाडोहीं कंदबवृक्ष, ज्यावर भगवान बसून वस्त्रहरण करितां झाला, त्या खालीं जाऊन स्नान तर्पण करून तदनंतर गोपीचंदनाचे टिळे व तुळशीच्या माळा घालून भगवंताचें ध्यान करीत वृंदावनांत अटलबिहारी, कुंजबिहारी, बालबिहारी राधाकिशोर

गोविंदजी या भगवंताच्या मूर्तींचीं दर्शनें घेतली. त्यांत कुंजविहारीं मध्यानकाळीं चोपाळ्यावर निद्रिस्थ दार लागलेले, परंतु चोपाळयाची दोरी आहेर ओढीत असत, ती आपले हातीं ओढून भगवंतास आंदोलन लीला केली. तेथून सेवावन, कुंजवन, ह्या स्थळीं गेलो. कुंजवन असें कीं भगवान लीला करतो असा भास होत असावा. सर्वहि वृक्ष छत्राकार ठेंगणे, कंटक नाहीं. हें पाहून आनंदमय होत्साता यमुनातीरीं रेतींत जेथें भगवंतानें बाळलीला केली होती; जेथील रेणु रजःकणाची प्राप्ती मस्तकीं वंदावयाकरितां ब्रह्मादिक देव इच्छितात, तेथें जाऊन लोळण घेऊन ती रेती मस्तकावर घेतली. भगवत्पर झालेल्या संत महंत, बैरागी यांचें दर्शन घेतलें. अनेक जन्मांचें सार्थक झालें !...दिल्लीस आलों तेथें दिल्लींतील चित्रें वगैरें विषय ज्यांत पाप नाहीं असेहि घेतले......."

पानिपतच्या युद्धाचें प्रत्यक्ष वर्णन करताना नाना फडणीस लिहितातः

"प्रातःकाळचे दोन घटका युद्धास गोळागोळीस प्रारंभ जाहला. श्रीमंत (भाऊसाहेब) अतिबुद्धिमान्, धैर्यवान्, शूर, कृतकर्मे गर्व मात्र विशिष्ट, परंतु सैन्याची तर्तूद फारच केली....मी श्रीमंताजवळ किंचित् करून असे. तो विश्वासरावास गोळी लागली. पडले....पठाण पाय उतारा होऊन आंत येऊन मिसळले. तोडातोडी होऊं लागली. अनेक बाजूचे मातबर सरदार, चौघड्याचे धनी हे देखील पूर्वींच पळाले. उजवे बाजूचेंही होळकर शिंदे निघोन निशाण निघाले. दोन तीन शत पायदळ होते. श्रीमंत (भाऊसाहेब) दिसेनासे झाले....!"

लढाई मोडल्यावर पळ सुरू झाला. त्या पळांत नानाहि माघारे निघाले. शत्रू पाठलाग करीत होता. प्रसंग मोठाच बिकट होता. नाना लिहितातः

"(युद्धांत) सर्व वाताहत जाहले. मी सायंकाळचे दोन घटका दिवसास घोड्यावर पाणिपतांत आलों. त्या देशाचा मार्ग अगदीं ठाऊक नाहीं. तेथे परमेश्वरें वाट दाखवायापुरते रामाजीपंत उभे होते. ते सांगू लागले घोडे, वस्त्रें टाकून द्यावीं. त्यांचें सांगण्यावरून सर्व टाकून शुद्ध लंगोटी लावून बसलों. रात्र जाहल्यावर चाललों. तों एका कोसांत तीन-चार वेळां शरीरास हात लावून टोपीवाल्यांनीं झाडा घेतला.

दरखेपेस समागमेचे दहावीस तोडून टाकीत. त्यात मी राहिलों ही सत्ता ईश्वराची पुढें दहा-बारा कोस पुढें गेलों. शत्रू येऊन पोहोचले. समागमेच्या लोकास जखमी भारी केले; पडले. मी एकटा राहिलों. तों गवतांत गेलों. ईश्वरें तृणें करून माझें रक्षण केले. त्यास मोहिनी घातली. ते गेल्यावर पुढें जाऊं लागलों. तो दुसरे मागून येऊन मिळाले. पुन्हा तृणांत जाऊन बसलों. तो जवळ येऊन काढूं लागले. ते समयीं ईश्वर त्यांतील एका वृद्धाचे मनांत संचार करितां झाला. तो म्हणाला, कशास मारतां ? मग गेले ! माझे शरीर अशक्त, उन पाहिलेच नाहीं. पायीं चालण्याचा अभ्यास नसतां सोळासत्राकोश अन्न उदका व्यतिरिक्त आलों. क्षुधा तिसरे प्रहरीं लागली. तेव्हां बोरीचा पाला सांपडला, तो खाऊन पाहिला. तो तोंडांत जाईना. सायंकाळीं गांवाबाहेर आलों. तेथें एका बैराग्यानें पीठ आणून दिलें. त्याची भाकर खादली ती आमृतासमान लागली. नंतर निद्रा केली. ”

—काव्यें सं. पत्रें यादी वगैरे—लेखांक १९२

: ४ :

विस्तृत आत्मचरित्र लिहावयाचा नाना फडणिसांचा विचार होता, असें दिसतें. त्यासाठीं केलेल्या टाचणांत स्वतःवर कोणते संकटप्रसंग आले ते त्यांनीं नमूद केले आहेत. नाना फडणीस लिहितातः

श्री

श्रीहरिहरात्मक ब्रह्म उभयतां देव मजवर कृपा करतात. ती वर्णिता बुद्धि चालत नाहीं. दान, तप, योग, परोपकार, पूजा, ध्यान, सेवा कांही एक घडलें नसतां...कृपासमुद्र, दीनदयाळ, भक्तानुकंपी, शरण्य या नामाचें सार्थक माझें ठायीं केलें. संकटांतून वाचविलें. असे—

१. नावेंत वाहात होतों. तेथें उदकांत नाव खडकावर फुटून बुडत असतां नावकरी यांनीं नाव काढून वांचविले.

२. पाणिपतावर बारा तेरादां शत्रूशीं गांठ पडली. जवळील मनुष्यें मारली मला वांचविलें.

३. नारायणरायाचे वेळेस गारद्यांकडून वांचविलें.

४. दादासाहेब यांस बुद्धि चांगली देऊन रक्षिलें.

५. तळेगांवावर इंग्रजांशीं लढाई चालू असतां मसलत निघतांच दिवा गेला, करंडा हरवला. पक्षी डेऱ्यावर बसला. असे तीन अपशकून मातबर झाले असता शत्रूचा पराभव करून यश दिल्हें.

६. एका मांत्रिकास आमचे वाईटविशीं मंत्रदेवताच स्मरेनाशी झाली.

७. घोड्यावरून पडलों, तेव्हां दोन दिवस भान नाहीं. असे असतां पडण्यायासून वांचलों.

८. दिवाळखान्यास आग लागली असतां, दिवाणखाण्याचें खांब रुजामा, पडदे जळाले. माणसास बुद्धी कवाड उघडण्याची होऊन अग्नी विझवून टाकला. संकट टळलें. इत्यादि.

—ऐतिहासिक टिपणें भाग १, लेखांक ३७

: ५ :

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर बारभाईंनीं कारभार सुरू केला. सत्ता आपल्या हातांत घेतली. त्यावेळीं नाना व बापू यांच्यांत मतभेद झाले. त्याचा परिणाम होऊन राज्यास अपाय होऊं नये म्हणून दोघांनीं एकत्र येऊन एक वागणुकीची संहिता ठरविली. ती अशी.

"यादी श्रीपंतप्रधान यांचे दौलतीविषयीं राजश्री बापू व नाना यांनीं सरळ चालून अकृत्रिमपणें दौलतींचा बंदोबस्त करावा याबद्दलची कलमें.—

१. श्रीमंत रावसाहेब यांच्या पायांशीं उभयतांनीं एकनिष्ठपणें राहून अकृत्रिमपणें सरळरीतीनें दौलतीचा बंदोबस्त करावा.

२. नानांनीं दौलतींत बापूंचें वडीलपण सर्व प्रकारें रक्षावें. बापूंनीं नानांवर दौलतीचा भार ठेवावा. आपपर किमपी लेखूं नये.

उभयतांनीं काडीचा संशय न धरतां एकदिलपणें वर्तणूक करावी. दिक्कत वाढली, संशय आला तरसमक्ष बोलून संशयनिवृत्ती करीत जावी. किंतू वाढूं देऊं नये, आंत-बाहेर नसावें. द्वैतार्थ तिळमात्र नसावा.

३. कारभाराचे यादीवर बापूंनीं " देवावें " करावें. नानांनीं " येणें प्रमाणें " करावें. याप्रमाणें उभयतांनीं चिन्हें करीत जावीं.

४. बापूंस पुत्र होईल किंवा दत्तक घेतील त्याला नानांनीं शहाणे करावें, स्वरूपास आणावें. बापूंप्रमाणें स्वरूप पाहून त्याचे हातून " देवावें " करवीत जावे. त्यास वडील सर्व प्रकारें नाना.

५. दौलतीत पैक्याची ओढ, याकरतां जमेची कामे येतील ती उभयतांनीं मन घालून उलगडीत जावीं.

६. बापूंच्या व नानांच्या जातीस परस्परें आच लावू नये. बापूंनीं नानांस पैक्याचा उपद्रव देऊं नये.

७. मागील गुणदोष उभयतांनीं मनांत तिळमात्र आणूं नये.

८. दौलतींत कामें काजे व खर्चवेंच करणे तो परस्परें परस्परांत बोलून करीत जावा. त्यांत कुन्हा (द्वेष–खुनशीपणा) ठेवूं नये आंत एक बाहेर एक नसावें.

९. बाहेर (परदरबाराशीं) राजकारणें करणें व पहाणें हीं उभयतांचीं अंतःकरणपूर्वक एक असावीं. तीं परस्परें कळवीत जावीं. आंतून एक व बाहेरून एक नसावें—इत्यादि.

ऐ. टि. भाग १–लेखांक २९

: ६ :

नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्यांत बंधुत्वाची शपथ क्रिया झाली होती. महादजी शिंदे नाना फडणीस यांना लिहितात—

" रा. बाळाजीपंत नाना गोसावी, सेवेसी महादजी शिंदे दंडवत. आम्हाकडील अर्थ रा. रामचंद्र शिवदेव यांणीं आपणास सांगितल्यावर

आपण शपथपूर्वक खातर जमा करून श्रीवरील तुळशी देतो असे बोलला. ते सर्व समजोन चित्तात परमसंतोष झाला. आम्हो श्रीवरील बेलभंडार पाठविला आहे. व हे पत्र शपथपूर्वक लिहिले आहे. आपण बंधुत्वाविषयीं संशय न धरणे. जेथें आपण आहां तेथें मी आहे हे शफथपूर्वक जाणावे. लोभ कीजे हे विनंति "—

—नाना फडणीस चरित्र (लेखक : खरेशास्त्री)

: ७ :

राक्षसभुवनाच्या लढाईंत विठ्ठलसुंदर मारले गेले. थोरले माधवराव या लढाईची हकीकत आपल्या मातोश्रींना लिहितांना लिहितातः—

..." त्यांचें आमचे झुंज झाले. फार निकडीचें हत्यार झाले. त्यांचा मोड झाला. आमची फत्ते जाहली. विठ्ठलसुंदर यांचें डोचकें कापून आणलें....विठ्ठलपंतासारखा इतबारी मर्द मोंगलास मिळणें नाहीं. पंधरा हत्ती, व पंचवीस तोफा व गोळे दारू डेरे दांडे राहिले ते व घोडी, उंट, बैल वगैरे लूट बहुत आली. पूर्वीं तीन लढाया झाल्या परंतु अशा प्रकारची जरब कधींच बसली नव्हती..."

: ८ :

पानिपतच्या लढाईंत नाना फडणीसांची आई होती. लढाईच्या धामधूमींत नानांची व तिची ताटातूट झाली. नानांनीं आईचा खूप तपास केला पण पत्ता लागला नाहीं. आपली आई मारली गेली असावी अगर शत्रूच्या कैदेंत असावी, असें वाटून नानांनीं दिल्लींतील मराठ्यांचें वकील हिंगणें यांना एक पत्र लिहिलें. त्यांत त्यांच्या आईंबद्दलच्या भावना दिसून येतात. नाना लिहितात :

" तीर्थरूप मातुश्रीची खबर अबदलीचे लष्करांत आहे म्हणून लागली आहे. तरी शोध करावा. आम्ही द्रव्याचे किती संग्रही आहों, हें तुम्हांस ठाऊकच आहे. याकरितां माझ्या शक्तिप्रमाणें जे द्यावयास

पडेल ते देऊं करून, निदान माझे सर्वस्व देऊ करून त्यांची मुक्तता होय, हेंच करावें. हें काम झाल्यानें करोडो कामें केलीशी होतील. मातुश्री मुक्त जाहल्यावरी जातीविशी शोध पुरता करावा. जर यथास्थीत प्रकार आहे तर देशास पाठवावी. नाहींतर प्रयागास गंगेत देहत्याग करण्यासाठीं परस्परेंच रवानगी करावी. जर शुद्धच आहेत आणि त्यांचा आग्रह यात्रेस जावयाचा असला तरी त्यास यात्रेस पाठवावी. मनांत गोष्टी सोडविण्याच्या फार येतात त्या किती लिहाव्या ? ब्राह्मण्यास आंचवली असली, तथापि सर्वस्व खर्च करून प्रयागास पाठवून द्यावी. म्हणजे पुत्र धर्माचे सार्थक !"

अधिकार योग (लेखक : श्री. खरेशास्त्री)

: ९ :

नाना फडणीसांचा कारभार टापटीपीचा असे. कारभारांत धांदल, गैरव्यवस्था त्यांना खपत नसे. कामाची योजना ते प्रथम आंखीत, कामें कोणीं करावयाचीं, कशी करावयाचीं व कधीं करावयाची याचा सर्व लहानसहान तपशील आगाऊ ठरवून ठेवीत. सवाई माधवराव यांचें लग्न १७८३ सालीं झाले. त्या प्रसंगींच्या कामांच्या नेमणुकीची यादी नानांनीं केली. निजाम, हैदर, इंग्रज यांचे प्रतिनिधी, छत्रपती व निरनिराळे सरदार यानिमित्त येणार होते. त्यांच्या व्यवस्थेबद्दल सर्व योजना आगावूच आंखलेली होती. नमुन्यादाखल—पाण्याबद्दल व्यवस्था कशी असावी याबद्दलच्या सूचनाच पाहा. नाना फडणीस लिहितात.

" स्नानाचें पाणी व प्यावयाचें पाणी तयार करावयाचे काम नि।। गंगाधर गोविंद.

उष्ण पाणी तापवून स्नानास येतील त्यास देत जावें. अभ्यंग करतील त्यास आग्रहें करून अधिक देत जावें. जसा समुदाय होत जाईल तशी तरतूद पाण्याची राखावी. बोभाट पडूं नये. भोजनोत्तर आंचवावयास उष्णपाणी व हातास लावावयास साखर व दांत कोरावयास लवंग याप्रमाणें देत जावे. साहित्यास असामी—

कारकून
शागिर्द
ब्राह्मण
रखवालीस प्यादे

प्यावयाचें पाणी गाळून शीतल करावें. वेळा, वाळा, कापूर, लावून उदवून सिद्ध करावें. सर्वांस भोजन समयीं व फराळाचे समयीं देत जावें. पहिल्यानें मागाहून असे दोन वेळ पंगतींतून चिखल न होतां पाणी वाढावें. रुप्याच्या कासंड्या, तांबे, पंचपात्रें, मातबरास समयोचित पाणी प्यावयास देण्याकरतां सिद्ध असो द्यावी. प्रयोजन लागेल तसें पाणी देत जावें. भांडीं पाणी प्याल्यावर माघारीं घ्यावी.

साहित्य—

भांडीं, कढया, हांडे, गंगाळे, घागरी व तपेली, लोटे, तांबे, व बोळक, रुप्याचीं भांडीं. कुंभार काम, बुरुड काम, खाद्या, कपडे पाणी गाळावयास व झाकावयासि. साखर धुवट, लवंगा, तबके, दांत कोरावयास काड्या सिद्ध ठेवाव्या.... ”

ही यादी ४८ कलमीं आहे.

काव्यइतिहास संग्रह, पत्रें यादी वगैरे. लेखांक ३९८ पृ. ३४३–३६१

◎ ◎ ◎

विविध दृष्टिकोनांतून साडेतीन शहाणे

१ : सखारामबापू

१. " सखारामबापू म्हणजे केवळ निधडा मनसबेबाज ! "

...भाऊसाहेब यांची बखर.

२. " सखारामबापू हे कंपनी सरकारचे कट्टे दुष्मन आहेत व नाना फडणीस हे अत्यंत कर्तृत्ववान गृहस्थ आहेत.

मॅस्टिन (इंग्रजांचे मराठ्यांच्या दरबारातील वकील) "

३. " बापू तर केवळ राज्यांसि किडाच ईश्वरें निर्माण केला "...

—परशुरामभाऊ पटवर्धन.

४. " बापूंना कैद झाली ही गोष्ट वाईट झाली. चांगला कर्ता पुरुष होता. " —परशुरामभाऊ पटवर्धन

५. " सखारामबापूंचीं कारस्थानें भूल पाडणारीं असत. तो कलीपुरुष आहे अशी गोपाळराव पटवर्धनांची खात्री होती. आपणच दंगा करावयाचा, आपणच तो मोडण्याचें श्रेय ध्यावयाचें व घटकेंतच आपण राजनिष्ठ बनावयाचें हे सारे सखारामाचे खेळ असत. "—वि. का. राजवाडे, म. इ. साधनें, खंड १ प्रस्तावना.

६. " तुम्ही (सखाराम बापू) मातबर शाहणे जवळ आसावे हे आमचे मानस. तुम्हास उचति तरी लवकर यावे... "

रघुनाथराव-दादासाहेब-पेशवे. पे. द. ५।८.

७. " येक खावंद शास्ता, पोख्ता कर्ता असावा. कोणाचें कोणीं न ऐकावें असें न व्हावें. सर्वांगीं येकावर भार द्यावा. राजश्री बापू सर्वांस वडील, केलेले पुरुष, त्यांनीं आवघे डोईवर घेऊन करावें. आम्ही तुम्ही सर्व त्यांस अनुकूल व्हावें. "

—त्रिंबकराव मामा पेठे यांचें नाना फडणीस यांना पत्र—

पे. द. खंड ५ लेखांक ३३.

◎ ◎ ◎

२ : देवाजीपंत चोरघडे

१. " देवाजीपंत क्रियानष्ट, दौलत बुडवावयाचे मनसबे करितात. त्यास कैदेंत घालावा "— —मुधोजी भोसले

२. देवाजी पंत हा मनुष्य तुमचे आमचे जाबसालांत नसावा. नाश करील. —पेशवे माधवराव

◎ ◎ ◎

३ : नाना फडणीस

१. " भले बुद्धिचे सागर नाना ऐसे नाहीं होणार। मर्दानें हो राज्य राखिले मनसुबीची तल्वार। " —शाहीर अनंतफंदी.

२. " नानांचें वचन पक्कें घ्यावें ते वचनास बहुत प्रामाणिक, अभिमान धरावा तो शेवटास न्यावा असें आहे. " —त्रिंबक महिपत पुरंदरे.

३. " राज्यकारभार चालविण्याचें शहाणपण नानास चांगलें होतें. तसेच छत्रपति व पेशवे या दोन पदांची संपूर्ण सत्ता त्याचे हातीं होती. परंतु लष्करी कामांत तो सर्वथैव लंगडा असल्यामुळें त्याच्या कारभारास यश आलें नाहीं. लष्करी कौशल्य त्यांचे अंगीं असतें तर तो आपला स्वतंत्र राज्यवंश स्थापूं शकला असता. ...कोल्बुक.

४. " नानांचें बोलणें कोणते समयीं कसें होईल याचा भरवसा धरावयाचा नाहीं. सारा दिवस बोलत असतां दस्तऐवज बोलण्यांत सांपडावयाचा नाहीं. या चाली बोलावयाच्या आहेत. काम लागले असतां साखरेपेक्षां गोड बोलावयास उशीर नाहीं; काम जाहल्यावर त्या गावचे नव्हतदेखील असा येथील विचार आहे. " —परशुरामभाऊ पटवर्धन.

५. नाना गेल्यामुळें हाहाःकार उडाला आहे, बुद्धी चालत नाहीं. —रघुनाथ पटवर्धन कुरुंदवाडकर

६. नाना फडणीस गेले आणि त्याबरोबरच मराठी राज्यांतील शहाणपणा व नेमस्तपणा ही लयास गेली. " — कर्नल पामर (इंग्रजांचे पुण्यांतील वकील.)

◎ ◎ ◎

साडेतीन शहाण्यांच्या जीवनाशीं संबंध असलेले प्रसंग आणि त्यांचा काळ.

सन	प्रसंग
१७१६	सखारामबापूंचा जन्म.
१७३२	शनिवारवाडा बांधणीच्या कामावर सखारामबापूंची कारकून म्हणून नेमणूक.
१७३५	बापू पुरंदरे यांचेबरोबर मोहिमा करूं लागतात.
१७४१	बापू बाळाजी बाजीराव पेशव्याबरोबर माळव्यांत स्वारीस जातात. मोहीम संपल्यावर ते काशी-प्रयाग-मथुरेची यात्रा करतात.
१७४२	११–फेब्रुवारी नाना फडणीसांचा जन्म.
१७४४	सखारामबापू फिरून उत्तर हिंदुस्थानचे स्वारीस जातात.
१७४६	सखारामबापू भाऊसाहेबांबरोबर कर्नाटक मोहिमेवर.
१७५१	सखारामबापू राघोबाबरोबर गुजराथेंत स्वारीस जातात. बापू स्वारीचे मुख्य कारभारी असतात.
१७५३	बापू गुजराथेंतून रघुनाथरावांबरोबर उत्तर हिंदुस्थानांत जातात.
१७५५	बापू व दादासाहेब उत्तरेंत काशी-प्रयाग क्षेत्रें सोडविण्याची खटपट करतात. पण त्यांत ते अयशस्वी.
१७५५	देवाजीपंत जानोजी भोसल्यातर्फे पेशव्यांशीं वाटाघाटी करतात. जानोजी भोसल्यांचा वारस होतो.
१७५६	नाना फडणीसांच्या वडलांचा मृत्यू.

१७५७	दादा व बापू उत्तरेंत मोहिमेवर. पंजाब अटकेपर्यंत मराठ्यांचे झेंडे फडकवतात. अटकेपर्यंतचा अबदलीचा अंमल उठवतात.
१७५७	सिंदखेड येथें निजामाशीं लढाई. विठ्ठलसुंदर व इब्राहीमखान निजामातर्फे मराठ्यांशीं लढतात.
१७५८	अटकेपर्यंत मोहीम केल्याबद्दल बापूंचा पगार सालीना ६० हजार रुपये होतो.
१७५८	विठ्ठलसुंदर निजामअल्लीस फ्रेंच गार्द्यांपासून वाचवितो.
१७५८	नाना श्रीरंगपट्टणचे मोहीमेंत हजर
१७५९	उदगीरची लढाई निजामाचा पराभव. विठ्ठलसुंदर यांस कारभारांतून काढून टाकण्याचा भाऊसाहेब तहाच्या वेळीं आग्रह धरतात.
१७६०–६१	नाना भाऊसाहेबांबरोबर पानिपतचे मोहिमेवर जातात.
१७६२	सखारामबापू मुख्य कारभारी होतात.
१७६३	नानांना फडणीसी कामाचीं वस्त्रें मिळतात.
१७६३	देवाजीपंत विठ्ठलसुंदरशीं संगनमत करतात. मराठी राज्याविरूद्ध दोघांचीं कारस्थानें चालतात. असंतुष्ट मराठे सरदारांना दोघे फितवितात.
१७६३	विठ्ठलसुंदर मराठ्यांच्या प्रदेशावर स्वारी करतात. पुणें, सासवड, पुरंदर हा प्रदेश ते लुटतात.
१०–८ १७६३	राक्षसभुवनच्या लढाईंत विठ्ठलसुंदर मराठ्यांच्याकडून मारले जातात.
१७६८	देवाजीपंत चोरघडे यांना माधवराव कैदेंत टाकतात.
१७६९	भोसल्याशीं कनकपूरचा तह, देवाजीपंत मध्यस्ती करतो.
१७७२	माधवराव नारायणरावांना सखारामबापूंचे हातीं देतात.
१७७२	माधवराव पेशव्यांचा मृत्यू.

१७७३　नारायणराव पेशवे गोपिकाबाईंच्या सांगण्यावरून बापूंना कारभारावरून दूर करतात.

३०-८-७३　नारायणरावांचा खून.

१७७३　सखारामबापू, नाना फडणीस बारभाईचें कारस्थान करतात. देवाजीपंत बारभाईंना मदत करतात.

१७७६　बारभाईतर्फे नाना व बापू इंग्रजाशीं "पुरंदरचा तह" करतात.

१७७८　मोरोबांचें नानांना कारभारांतून हुसकण्याचें कारस्थान. नाना फडणीस युक्तीनें कारस्थान उधळतात.

१७७९　वडगांव–तळेगांवच्या लढाईंत इंग्रजांचा मराठयांकडून पराभव. वडगांवचा तह. इंग्रजांच्या आश्रयाला गेलेले दादा-साहेब मराठ्यांच्याकडे येतात.

१७७९　इंग्रजांशीं सख्य करूं नये असा इशारा बापू देवाजी-पंतांना देतात.

१७७९　सखारामबापूंच्या मुलीचा विवाह.

१७७९　फितुरीसाठीं सखारामबापूंना शिंदे कैद करतात. बापूंची सिंहगडवर रवानगी.

१७८१　देवाजीपंतांचा नागपूरला मृत्यू.

१७८१　सखारामबापूंचे रायगडवर कैदेंत निधन.

१७८२　इंग्रजांशीं मराठ्यांचें युद्ध.

१७८३　नाना इंग्रजांशीं सालबाईचा तह करतात.

१७९१　निजाम व इंग्रजांशीं संगनमत करून नाना टिपूवर मोहिम काढतात. टीपूचा पराभव.

१७९२　नानांच्या कारभाराचा परमोच्च बिंदू. महादजी शिंदे दिल्लीहून फर्मानें आणतात. फर्मान वाडीचा समारंभ.

१७९४　महादजी शिंदे व हरिपंत फडके यांचा मृत्यू. नानांची शक्ती कमी झाली.

१७९५	खड्र्याची लढाई, निजामाचा पराभव.
१७९५	सवाई माधवरावांचा मृत्यू. त्यांच्या मृत्यूनें नानांना दुःख !
१७९६	दुसरे बाजीराव पेशवे होतात. कट, गोंधळामुळें कारभार सोडून नाना मेणवलीस व नंतर रायगडी जातात. नानांनीं रायगडावर सिंहासनासमोर नगारखाना बांधला.
१७९६	नाना महाडचें कारस्थान करतात.
१७९७	दौलतराव शिंदे नानांना कैद करतात.
१७९८	नगरच्या किल्ल्यांत नानांची रवानगी.
१७९८ १७९९	बाजीरावांचे सांगण्यावरून नाना कारभार हातांत घेतात
१३ मार्च १८००	नाना फडणीसांचा पुण्यास मृत्यू. नानांच्या मृत्यूनें साडेतीन शहाण्यांचा शेवट.

आधारभूत ग्रंथ

१. हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास मराठी रियासत:— लेखक : श्री. गो. स. सरदेसाई.
२. नाना फडणीस यांचें चरित्र लेखक : श्री. वा. वा. खरेशास्त्री.
३. मराठी राज्याचा उत्तरार्ध खंड संपादक : श्री. य. वा. खरे,
४. ऐतिहासिक लेखसंग्रह— संपादक : श्री. वा. वा. खरेशास्त्री
५. काव्येतिहास संग्रहांत प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रें, यादी, वगैरे लेख. संपादक : श्री. का. ना. साने.
६. ऐतिहासिक प्रस्तावना लेखक : श्री. वि. का. राजवाडे.
७. पेशवे दप्तर भाग. २, ५, ७. ९, १२, ३५, ३९.
८. पुरंदरे दप्तर भाग ३. संपादक : श्री. कृ. वा. पुरंदरे.
९. माधवराव पेशवे चरित्र लेखक : श्री. स. अ. सहस्त्रबुद्धे.
१०. सखारामबापूचें चरित्र लेखक : श्री. य. गो. कानिटकर
११. ऐतिहासिक पोवाडे संपादक : श्री. य. न. केळकर.
१२. हिंगणे दप्तर भाग १ संपादक : श्री. ग. ह. खरे.
१३. नाना फडणवीस शकावली श्री. शं. ना. जोशी
१४. थोरले माधवराव पेशवे शकावली श्री. शं. ना. जोशी
१५. भा. इ. सं. मं. त्रैमासिकाचे अंक......

◎ ◎ ◎

किंमत दीड रुपया

इनामदार बंधु
प्रकाशन